


**मुलांच्या आणि मोठ्यांच्याही हृदयाला स्पर्श करणारी**
**एक विलक्षण सत्यकथा... हॅनाची सूटकेस**

टोकियोतील 'हॉलोकास्ट एज्युकेशन सेंटर' या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या केंद्रावर २००० सालच्या मार्च महिन्यात एक सूटकेस येऊन पोहोचली. त्यावर पांढऱ्या रंगात लिहिलेलं होतं, 'हॅना ब्रॅडी, १६ मे १९३१ - अनाथ'.

ही सूटकेस पाहून मुलांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले,
ही हॅना कोण?... तिचं काय झालं?...

सेंटरच्या संचालिका फ्युमिको इशियोका यांनी या प्रश्नांची उत्तरं द्यावीत अशी मुलांची अपेक्षा होती. फ्युमिकोला तरी ती उत्तरं कुठे माहीत होती? पण तिने चंगच बांधला आणि या हॅनाचा शोध घेत ती जपानमधून युरोपपर्यंत आणि पुढे कॅनडापर्यंत जाऊन पोहोचली. काळाच्या उदरात गडप झालेल्या हॅनासाठी ती भूतकाळाच्या भुयारात ७० वर्षं मागेही गेली.


तिच्या या शोधाचीच ही यशस्वी आणि दुःखद कहाणी!

**अल्पावधीतच हे पुस्तक जगातल्या ३७ भाषांत पोहोचले आणि अनेक देशांत विक्रमी खपाचे ठरले. या मूळ इंग्रजी पुस्तकाला आजवर अनेक जागतिक पुरस्कार मिळाले आहेत.**

WINNER


...ा प्रकाशन
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे३०
...ा, १६२ ज.शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ०४
...naprakashan.com

9 788179 251805

# हॅनाची सूटकेस

कॅरन लीवाईन

मराठी अनुवाद : माधुरी पुरंदरे

Jude

ज्योत्स्ना प्रकाशन

# हॅनाची सूटकेस

कॅरन लीवाईन
मराठी अनुवाद : माधुरी पुरंदरे

# दोन शब्द

'हॅनाची सूटकेस' ही एक सत्यकथा आहे. जवळजवळ सत्तर वर्षांच्या काळात जगातल्या तीन खंडांमध्ये ती घडते. १९३० आणि ४०च्या दशकांमधल्या चेकोस्लोव्हाकिया या देशातल्या एका मुलीचे आणि तिच्या कुटुंबाचे अनुभव; आजच्या काळातल्या जपानमधल्या टोकियो या शहरात राहणारी एक तरुण स्त्री आणि काम करणाऱ्या लहान मुलांचा एक गट; आणि कॅनडामधल्या टोरांटो या शहरात राहणारे एक गृहस्थ, या सर्वांना ही कथा एकत्र आणते.

१९३९ ते १९४५ या काळात जगात दुसरं महायुद्ध[१] चालू होतं. जर्मनीचा नाझी[२] हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर याला संपूर्ण जगावर जर्मनीचं राज्य असावं असं वाटत होतं. ज्यू धर्माच्या सर्व लोकांना पृथ्वीच्या पाठीवरून निर्दयपणे नाहीसं करणं, हा त्याच्या ह्या स्वप्नातला मुख्य विचार होता. आपल्या ह्या 'शत्रूंचा' नाश करण्याकरता त्यानं युरोपभर तुरुंगासारख्या अनेक छावण्या निर्माण केल्या. त्यांना छळछावण्या[३] असंच म्हणत. युरोपातील जवळपास सर्व देशांमधल्या ज्यू स्त्रिया, पुरुष आणि लहान मुलांना त्यांच्या घरांपासून तोडून या छावण्यांमध्ये डांबलं गेलं आणि त्यांना तिथे भयंकर यातना सोसाव्या लागल्या. बहुतेकांना ठार मारण्यात आलं, तर अनेक जण उपासमार आणि रोगराई यामुळे मरण पावले. या मृत्यूच्या छावण्यांमध्ये आणि जिथेजिथे हिटलरचे अनुयायी त्याच्या भयानक योजना राबवण्यासाठी काम करत होते अशा सर्व ठिकाणी मिळून साठ लाख ज्यू लोकांना ठार केलं गेलं. यांपैकी पंधरा लाख लहान मुलं होती.

१९४५मध्ये युद्ध संपलं, आणि छळछावण्यांमध्ये ज्या भयंकर गोष्टी घडल्या होत्या त्यांची माहिती जगाला कळली. माणसाच्या इतिहासातली सामूहिक हत्यांची ही सर्वांत भयानक घटना होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलर व त्याचा नाझी पक्ष यांनी ज्यू धर्मीयांचा युरोपमध्ये संहार केला. त्या नरसंहाराला इंग्रजीत 'हॉलोकॉस्ट' असं म्हणतात. हे कसं घडलं आणि ते पुन्हा होऊ नये याकरता काय करता येईल, हे समजून घेण्याचा प्रयत्न लोक तेव्हापासून करत आहेत.

दुसऱ्या महायुद्धात जपान हा नाझी जर्मनीचा मित्र-देश होता. हॉलोकॉस्टच्या इतिहासाकडे जपानचं लक्ष अलीकडेच गेलं आहे. जगात सहिष्णुता आणि सामंजस्य नांदावं, वाढीला लागावं यासाठी काहीतरी करण्याची इच्छा असलेला एक दानशूर गृहस्थ जपानमध्ये होता. आपलं नाव जाहीर होऊ नये अशी त्याची इच्छा होती. पण जगाच्या इतिहासातल्या ह्या महत्त्वाच्या घटनेबद्दल जपानमधल्या लहान मुलांना कळलं पाहिजे असं त्याला वाटलं, आणि म्हणून त्यानं एकट्यानं 'टोकियो हॉलोकॉस्ट एज्युकेशन रिसोर्स सेंटर' ही संस्था उभी केली.

१९९९ साली हॉलोकॉस्टसंबंधी लहान मुलांची एक परिषद भरली होती. तिथे टोकियो आणि परिसरातल्या दोनशे शालेय विद्यार्थ्यांची हॉलोकॉस्टमधून वाचलेल्या याफा एलियाच या बाईंशी भेट झाली. आपल्या गावातल्या जवळजवळ सर्व लहानमोठ्या आणि वृद्ध ज्यूंना नाझींनी कसं ठार केलं, ते एलियाच यांनी सांगितलं. आपल्या भाषणात पुढे त्यांनी सांगितलं, 'भविष्यात जगामध्ये शांतता निर्माण करण्याची ताकद मुलांमध्ये आहे.' दहा-बारा तरुण जपानी मुलांनी हे आव्हान स्वीकारलं आणि 'स्मॉल विंग्ज' नावाचा लहानसा गट स्थापन केला. आता या गटाचे आठ ते अठरा वर्षं वयाचे हे सभासद दर महिन्याला भेटतात. ते एक वार्तापत्र प्रसिद्ध करतात, सेंटर चालवण्यासाठी मदत करतात, आणि जपानमधल्या इतर मुलांनी इतिहासामध्ये रस घ्यावा, याकरता काम करतात. 'सेंटर'च्या संचालिका फ्युमिको इशिओका यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचं हे काम चालतं.



त्यांच्या या कामाला मिळालेल्या यशाची किल्ली म्हणजे ही सूटकेस - हॅनाची सूटकेस. त्या सूटकेसमध्ये एक गोष्ट आहे. कमालीच्या दुःखाची आणि त्याच वेळी खूप आनंदाची गोष्ट. भूतकाळामधल्या अत्याचारांची आठवण करून देणारी आणि भविष्याबद्दलची आशा जागी करणारी गोष्ट.

१ दुसरं महायुद्ध (१९३९-१९४५) - स्वतःची सत्ता संपूर्ण जगावर प्रस्थापित करण्याच्या उद्देशानं प्रथम जर्मनीनं अनेक देशांवर आक्रमण केलं. युरोप आणि नंतर अमेरिका, आफ्रिका, रशियापासून पूर्वेकडच्या जपानपर्यंत अनेक देश त्यात होरपळून निघाले. एकट्या युरोप खंडात सैनिक आणि नागरिक मिळून अडीच कोटी माणसं मृत्युमुखी पडली आणि मालमत्तेचा प्रचंड विध्वंस झाला.

२ नाझी - पहिल्या महायुद्धात १९१८ साली जर्मनीचा पराभव झाल्यानंतर ॲडॉल्फ हिटलर यानं 'नॅशनल सोशालिस्ट वर्कर्स पार्टी' हा पक्ष स्थापन केला; त्यालाच 'नाझी' असंही म्हटलं जाई. १९३३ साली हा पक्ष सत्तेवर आला आणि लवकरच हिटलर जर्मनीचा हुकूमशहा झाला. त्याचे कार्यकर्ते, अनुयायी, सैनिक अशा सर्वांनाच 'नाझी' म्हटलं जाई. पण अगदी युद्धकाळातही सगळेच जर्मन नागरिक 'नाझी' नव्हते, हे लक्षात घ्यायला हवं.

३ छळछावणी - हिटलरच्या हुकूमशाही राजवटीत ज्यू धर्माचे लोक, राजकीय विरोधक, हलक्या वंशाच्या समजल्या जाणाऱ्या जमातींचे लोक अशा लाखो लोकांना डांबून ठेवण्याकरता छावण्या उभारल्या गेल्या. तिथे कैद्यांकडून कामं करून घेतली जात. दुबळे, विकलांग, वृद्ध, आजारी व मुलं यांना सरळ ठार मारलं जाई. त्यांना ठार मारण्याकरता 'गॅस चेंबर'चा वापर केला जाई. गॅस चेंबर म्हणजे एक हवाबंद खोली. या खोलीत कैद्यांना कोंबलं जाई आणि खोलीत विषारी वायू सोडून त्यांना ठार मारलं जाई.

## टोकियो : जपान

## हिवाळा – २०००

खरं तर ती एक अतिशय सामान्य दिसणारी सूटकेस आहे. कडांपाशी थोडीशी फाटलेली, पण एरवी एकंदरीत चांगल्या स्थितीतली आहे.

सूटकेस तपकिरी रंगाची आहे. मोठी आहे. बरंच सामान मावू शकेल अशी. म्हणजे मोठ्या प्रवासापुरते कपडे, पुस्तकं, खेळ, जमा केलेला खजिना, खेळणी, वगैरे; पण आता तिच्यात काहीच नाही.

टोकियोमधल्या एका लहानशा वस्तुसंग्रहालयात काचेच्या कपाटात ही सूटकेस ठेवलेली आहे. ही पाहायला रोज अनेक लहान मुलं येतात. तिच्यावर काहीतरी लिहिलेलं आहे, हे त्या काचेतून दिसतं. सूटकेसच्या झाकणावर पांढऱ्या रंगात एका मुलीचं नाव लिहिलेलं आहे - हॅना ब्रॅडी. पुढे जन्मतारीख आहे, १६ मे १९३१. खाली आणखी एक शब्द आहे - वाइजनकिंड. या जर्मन शब्दाचा अर्थ - अनाथ.

ही सूटकेस आउसश्वित्स नावाच्या छळछावणीतून आलेली आहे, हे जपानी मुलांना माहिती आहे. १९३९ ते १९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धात या छावणीमध्ये लाखो माणसांचे हाल होऊन ती मरण पावली. पण ही हॅना ब्रॅडी कोण होती? ती कुठल्या गावची होती? कुठे चालली होती? तिनं सूटकेसमध्ये काय भरलं होतं? ती अनाथ कशी झाली? ती कशी मुलगी होती आणि तिचं काय



झालं? मुलांना असे खूप प्रश्न पडतात. संग्रहालयाची संचालिका असलेल्या, खांद्यापर्यंत काळ्याभोर केसांच्या, सडपातळ अंगकाठीच्या तरुण फ्युमिको इशिओकालाही असेच प्रश्न पडतात.

मग एक दिवस फ्युमिको आणि मुलं त्या काचेच्या कपाटातली सूटकेस हलकेच बाहेर काढतात आणि उघडून बघतात. आतल्या कप्प्यांमध्ये शोधतात. कदाचित हॅनानं तिथे काहीतरी ठेवलेलं असेल आणि त्यावरून काही कळू शकेल. काहीही सापडत नाही! आतल्या ठिपक्यांच्या अस्तरातही ते बघतात. तिथेही काही सापडत नाही.

हे गूढ उकलण्यासाठी, ही सूटकेस ज्या मुलीची आहे तिची माहिती मिळवण्यासाठी सगळे प्रयत्न करण्याचं वचन फ्युमिको मुलांना देते; आणि मग पुढल्याच वर्षी ती 'डिटेक्टिव्ह' बनते. हॅना ब्रॅडीच्या कहाणीचे धागेदोरे शोधण्यासाठी सगळं जग पालथं घालणारी डिटेक्टिव्ह.




हॅनाची सूटकेस.



नोव्हे मेस्टो आणि सभोवतालचा परिसर.



# नोव्हे मेस्टो : चेकोस्लोव्हाकिया

## १९३० चं दशक

त्या काळात ज्याचं नाव चेकोस्लोव्हाकिया होतं, त्या देशामध्ये मोराविया नावाचा प्रांत होता. तिथल्या उंचसखल टेकड्यांच्या प्रदेशात नोव्हे मेस्टो नावाचं शहर होतं. ते मोठं नसलं तरी प्रसिद्ध होतं. विशेषतः हिवाळ्यात ते गजबजून जात असे. देशभरातून क्रॉस कंट्री स्की[४] करायला इथे लोक येत. तिथे शर्यती होत, तसंच गोठलेल्या तळ्यांवर लोक स्केटिंग[४] करत. उन्हाळ्यामध्ये लोक तिथे पोहायला येत, बोटीतून सफर करत, मासेमारी करत आणि छोटे तंबू ठोकून 'कॅम्पिंग' करत.

नोव्हे मेस्टोची लोकसंख्या चार हजार होती. कधी काळी काचनिर्मितीसाठी हे शहर प्रसिद्ध होतं, पण १९३०च्या दशकामध्ये लोक जंगलात आणि 'स्की' बनवण्याच्या कारखान्यांमध्ये काम करत. शहरातल्या मुख्य रस्त्यावर एक मोठी पांढरी दुमजली इमारत होती. तिच्या छपराखाली एक दुमजली पोटमाळा[५] होता आणि तळघरातून गावच्या मुख्य चौकातल्या चर्चपर्यंत जाणारा एक गुप्त रस्ता होता. जुन्या काळी गावाला शत्रूनं वेढा घातला की गावकऱ्यांसाठी अन्नधान्याचा साठा करून ठेवण्याकरता सैनिक या इमारतीचा वापर करत.

तळमजल्यावर विविध वस्तुभांडार होतं. तिथे जवळजवळ सगळं मिळत असे: बटणं, जॅम, तेलाचे दिवे, अवजारं, बर्फावरच्या घसरगाडीला लावण्याच्या घंटा,

सुऱ्यांना धार लावण्यासाठी दगड, प्लेटी, कागद आणि पेनं, आणि कँडी[१]. तिथेच दुसऱ्या मजल्यावर ब्रॅडी कुटुंब राहत असे. वडील कॅरल, आई मार्केता, हॅना आणि तिचा भाऊ जॉर्ज.

वडील आठवड्यातले सहा दिवस दुकानात काम करत. ते ॲथलीट होते. नोव्हे मेस्टोमधल्या बहुतेक सर्वांना त्यांचं फुटबॉल, स्की आणि जिमनॅस्टिक्स या खेळांवरचं प्रेम माहीत होतं. ते हौशी नटदेखील होते आणि त्यांचा खडा आवाज खेळाच्या मैदानावरही या टोकापासून त्या टोकापर्यंत स्पष्ट ऐकू जात असे. त्यामुळे क्रॉस कंट्री स्कीच्या शर्यतीच्या वेळी मैदानावरच्या घडामोडी सर्वांना कळाव्यात म्हणून मेगाफोनवरून धावतं वर्णन करण्यासाठी त्यांनाच बोलावलं जाई. शिवाय गावातल्या अग्निशामकदलात स्वयंसेवक म्हणूनही ते काम करत आणि संकटाच्या वेळी इतर स्वयंसेवकांबरोबर आगीचा बंब घेऊन मदतीला धावून जात.

ब्रॅडी कुटुंबाचं घर सर्व प्रकारच्या कलाकारांसाठी खुलं असे. संगीतकार, चित्रकार, कवी आणि नट वगैरेंना बोश्काच्या, घरातल्या स्वयंपाकिणीच्या, हातचं गरम जेवण नेहमीच मिळत असे. शिवाय त्यांच्या कलेला दाद देणारे प्रेक्षक-श्रोतेही तिथे भेटत. त्यांत, अर्थात हॅना आणि जॉर्ज ही दोन खट्याळ मुलं असतच. कधीकधी जॉर्जला व्हायोलीन वाजवून दाखवण्याचा आग्रह होई. ऐकायला समोर कुणी असलं की आपलं पियानो वाजवण्यातलं कौशल्य दाखवायला हॅना तर एका पायावर तयार असे. दिवाणखान्यात हातानं किल्ली देण्याचा ग्रामोफोन होता. हॅना त्यावर आपलं आवडतं गाणं पुन्हापुन्हा वाजवत असे - 'माझ्याकडे आहेत पाखरं नऊ...'

आई पाहुण्यांचं मनापासून स्वागत करीत असे. तिच्यापाशी चांगली विनोदबुद्धी होती आणि ती मोठ्यानं मोकळं हसायची. आठवड्यातले सहा दिवस तीही दुकानात काम करीत असे, आणि अनेकदा लोक केवळ तिचे विनोद आणि चेष्टामस्करी ऐकायला दुकानात येऊन बसत. नोव्हे मेस्टो शहराच्या सीमेवर राहणाऱ्या गरीब लोकांबद्दल तिला विशेष कणव होती. आठवड्यातून एकदा ती थोडे खाण्याचे पदार्थ



आणि कपडे एका गाठोड्यात बांधायची आणि मग हॅना आपल्या या गरजू शेजाऱ्यांना ते नेऊन द्यायची. तिला आपल्या या कामाचा मोठा अभिमान वाटायचा. अशी गाठोडी नेहमीनेहमी बांधून दे, असा आग्रह ती आपल्या आईपाशी धरायची.

दुकानात हॅना मदतनिसाचं काम करीत असे. लहान असल्यापासूनच हॅना आणि जॉर्जकडे दुकानातली शेल्फं नीटनेटकी आणि स्वच्छ ठेवण्याचं, त्यांच्यावर



शाळेतील एका नाटकासाठी केलेल्या वेषभूषेत हॅना.

माल नीट मांडून ठेवण्याचं काम होतं. यीस्टचे काप कसे करायचे, कँडी कशा पाडायच्या, मसाल्याच्या पदार्थांचं वजन कसं करायचं, कँडी भरण्यासाठी कागदाची गुंडाळी करून त्याचा कोन कसा करायचा हे ते शिकले होते. क्वचित कधीतरी कँडी भरलेल्या कोनांमधला एखादा नाहीसा झाल्याचं आईच्या लक्षात येई; पण हॅनानं जॉर्जची आणि जॉर्जनंही हॅनाची चहाडी कधी केली नाही.

दुकानात नेहमीच मांजरं वावरत असायची. उंदीर पकडणारे पूर्ण वेळ कर्मचारीच होते ते. पण एकदा आई-वडिलांनी मुलांना भेट म्हणून अंगोरा जातीच्या मांजराची गुबगुबीत पांढरी पिलं मागवली. हवेसाठी छिद्रं पाडलेल्या एका पेटीतून ती दोन मऊ बंडलं पोस्टानं आली. घरातली भलीदांडगी, वूल्फहाउन्ड जातीची, करड्या रंगाची केसाळ कुत्री सिल्व्हा सुरुवातीला संशयानं वास घेत त्यांच्याभोवती फिरली; पण



नोव्हे मेस्टो. डावीकडून चौथ्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ब्रॅडी कुटुंब राहत असे. याच इमारतीच्या तळमजल्यावर त्यांचं दुकान होतं.



लवकरच ती पिल्लं कुटुंबातली सदस्य झाली. हॅनानं त्यांची 'मिकी' आणि 'मुरेक' अशी नावं ठेवली.

हॅना आणि जॉर्ज पब्लिक स्कूलमध्ये जात. इतर चार मुलांसारखीच ही मुलं होती. त्यांच्यासारखीच व्रात्य होती. इतर मुलांसारखंच त्यांना कधी काही करायला जमत होतं, तर कधी जमत नव्हतं. त्यांची फक्त एकच गोष्ट इतरांहून वेगळी होती.

ब्रॅडी कुटुंब ज्यू धर्मीय होतं. तसं ते फारसं धार्मिक वगैरे नव्हतं; पण मुलांना आपल्या परंपरा माहीत असाव्यात, असं आई-वडिलांना वाटे. आठवड्यातून एकदा, ज्या वेळी हॅना आणि जॉर्जचे खेळगडी चर्चमध्ये जात त्या वेळी, एक खास धर्मगुरू त्यांना ज्यू धर्मातल्या सणांबद्दल आणि ज्यू लोकांच्या इतिहासाबद्दल सांगण्यासाठी येत.

नोव्हे मेस्टोमध्ये आणखीही काही ज्यू कुटुंबं होती, पण हॅना आणि जॉर्ज वगळता दुसरी लहान ज्यू मुलं मात्र गावात नव्हती. सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्यांचा वेगळेपणा कुणाच्या लक्षात आला नाही किंवा त्याकडे कुणी फारसं लक्षही दिलं नाही. पण त्यांचं ज्यू असणं ही लवकरच त्यांच्या बाबतीत सर्वांत महत्त्वाची गोष्ट ठरणार होती.

४ स्की आणि स्केटिंग - बर्फावर खेळण्याचे हे दोन वेगळे खेळ आहेत. स्की भुसभुशीत बर्फावर खेळला जातो आणि स्केटिंग पाणी गोठून झालेल्या कडक आणि गुळगुळीत बर्फाच्या पृष्ठभागावर केलं जातं. स्की करण्यासाठी साधारण खेळाडूच्या उंचीएवढ्या आणि वीतभर रुंदीच्या लांब लाकडी पट्ट्या वापरतात. स्केटिंगसाठी बुटांच्या तळव्यांना तेवढ्याच लांबीची उभी पातळ पट्टी ठोकलेली असते.

५ दुमजली पोटमाळा - हिमवृष्टी होणाऱ्या प्रदेशात घरांच्या छतावर पडणारं हिम ओघळून जावं म्हणून छत जास्त उतरतं असतं आणि त्यामुळे त्याची उंचीही बरीच जास्त असते. साहजिकच आत पोटमाळ्याला भरपूर उंची मिळाल्यानं तो दुमजली करता येतो.

६ कँडी - साखरेचा पाक वापरून केलेल्या गोळ्या, वड्या इत्यादी प्रकारचा गोड खाऊ.

# टोकियो

## हिवाळा २०००

अर्धं शतक, म्हणजे पन्नास वर्षं उलटून गेली. जगाच्या दुसऱ्या टोकाला असणाऱ्या जपानमध्ये फ्युमिको इशिओका आपल्या ऑफिसमध्ये बसली होती. हॅनाची सूटकेस आपल्याकडे कशी आली, ते तिला आठवलं.

१९९८ साली 'टोकियो हॉलोकॉस्ट रिसोर्स सेंटर' नावाच्या एका छोट्या संग्रहालयाची समन्वयक म्हणून फ्युमिको काम करायला लागली. जपानी मुलांना हॉलोकॉस्टबद्दल माहिती देणं, हा या संग्रहालयाचा मुख्य उद्देश होता. इस्राईलमध्ये भरलेल्या एका परिषदेत हॉलोकॉस्टमधून, म्हणजे भीषण छळछावण्यांमधून वाचलेल्या काही व्यक्तींशी फ्युमिकोची गाठ पडली होती. इतक्या भयानक अनुभवांतून गेल्यानंतरही त्यांच्यांत असणारा आशावाद आणि जगण्यात त्यांना वाटणारा आनंद पाहून तिला फार आश्चर्य वाटलं होतं. फ्युमिकोला आपल्या स्वतःच्या आयुष्यात जेव्हा दुःखांना सामोरं जावं लागे, तेव्हा तिला नेहमी या लोकांची आठवण येई. प्रचंड इच्छाशक्ती असलेले किती शहाणे लोक होते ते! शिकण्यासारखं त्यांच्यापाशी खूप काही होतं.

जपानमधल्या मुलांनीही हॉलोकॉस्टच्या घटनेपासून काहीतरी शिकावं, अशी फ्युमिकोची इच्छा होती. केंद्राची समन्वयक म्हणून तिचं ते कामच होतं, पण ते सोपं





सेंटरमधील मुलांना हॉलोकॉस्टबद्दल माहिती सांगताना फ्युमिको.

नव्हतं. पन्नास वर्षांपूर्वी दूरच्या एका खंडात लाखो ज्यू मुलांवर जो भयंकर प्रसंग ओढवला होता, त्याबद्दल जपानी मुलांना कसं समजावून सांगावं, असा प्रश्न तिच्यापुढे होता.

फ्युमिकोनं ठरवलं की, मुलं प्रत्यक्ष पाहू शकतील, स्पर्श करू शकतील अशा वस्तूंपासून सुरुवात करावी. मग तिनं पोलंड, जर्मनी, अमेरिका, इस्राईल वगैरे देशांमध्ये असलेल्या ज्यू धर्माविषयीच्या आणि हॉलोकॉस्टबद्दलच्या संग्रहालयांना पत्रं लिहिली. युद्धकाळातल्या ज्यू मुलांच्या काही वस्तू आपल्याला थोड्या काळासाठी उसन्या मिळाव्यात, अशी तिनं विनंती केली. इंटरनेटवरूनही तिनं ही विनंती सर्वत्र पाठवली. ज्यांची मदत होऊ शकेल असं तिला वाटलं, अशा काही व्यक्तींनाही तिनं लिहिलं. एखादा बुटांचा जोड किंवा एखादी सूटकेस मिळाली तर फ्युमिकोला हवी होती.

तिच्या पत्रांना उत्तरं आली, पण 'आमच्याकडे असलेल्या वस्तू फार महत्त्वाच्या आणि मौल्यवान आहेत. इतक्या दूर असलेल्या छोट्याशा संग्रहालयाला त्या पाठवता येणार नाहीत,' अशा सबबी सांगून सगळ्यांनीच तिला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. आता पुढे काय करावं ते फ्युमिकोला कळेना. पण ती सहजासहजी हार मानणाऱ्यांतली नव्हती. उलट, जितके नकार मिळाले तितका तिचा वस्तू मिळवण्याचा निश्चय पक्का होत गेला.

त्या वर्षी शरद ऋतूमध्ये फ्युमिको पोलंडला गेली. युद्धकाळात पोलंडमध्ये अनेक ठिकाणी नाझी छळछावण्या उभारल्या गेल्या होत्या. आउसश्वित्स या सर्वांत कुप्रसिद्ध छळछावणीच्या जागेवरच उभारलेल्या संग्रहालयाला तिनं भेट दिली. संग्रहालयाच्या उपसंचालकांची थोडा वेळ भेट मिळावी म्हणून तिनं विनंती केली. आपलं म्हणणं




टोकियो हॉलोकॉस्ट एज्युकेशन रिसोर्स सेंटर, जपान.



मांडण्यासाठी तिला फक्त पाच मिनिटं मिळाली. पण उपसंचालकांकडून 'तुमच्या विनंतीचा विचार करू' असं आश्वासन घेऊनच ती बाहेर पडली.

काही महिन्यांनी आउसश्वित्स संग्रहालयाकडून एक पार्सल आलं. त्यात होता लहान मुलाचा एक पायमोजा, एक बूट, एक लहानसा स्वेटर, झायक्लॉन बी या विषारी वायूचा एक कॅन आणि एक सूटकेस - हॅनाची सूटकेस.



सेंटरला भेट देणाऱ्या एका मुलीबरोबर फ्युमिको इशिओका.



लहानपणी हॅनाला मोकळ्यावर खेळायला खूप आवडत असे.



# नोव्हे मेस्टो

## १९३८

हॅनाचे केस सोनेरी होते, डोळे निळे होते आणि चेहरा सुरेख, गोल होता. ती तब्येतीनं चांगली गुटगुटीत होती. अधूनमधून आपली ताकद दाखवण्याकरता ती जॉर्जबरोबर भांडण उकरून काढे. तो तिच्याहून तीन वर्षांनी मोठा असला, तरी कधीकधी भांडणात हॅनाचाच जय होई. पण बहुतेक वेळा हॅना आणि जॉर्ज गोडीगुलाबीनं आणि शहाण्यासारखं खेळत. उन्हाळ्याच्या दिवसांत घरामागच्या ओहोळामध्ये ते नौदल-नौदल असा एक खेळ खेळत. कपडे धुण्याचा एक मोठा लाकडी टब पाण्यात सोडून दोन्ही मुलं त्यात बसत आणि तरंगत जात. मग एक जण टबाच्या तळाशी असलेलं बूच ओढून काढे. तिथून आत शिरलेलं पाणी एकमेकांवर उडवत, खिदळत त्या 'बोटी'सह तेही बुडत. घरामागे पसरलेल्या कुरणामध्ये तीन प्रकारचे झोपाळे होते. एक लहान बाळांसाठी होता, दुसरा दोन मुलं बसतील असा होता तर तिसरा ओहोळाकाठी असलेल्या भल्यामोठ्या झाडाच्या फांदीला टांगलेला होता. कधीकधी शेजारपाजारची मुलं झोक्यावरची शर्यत लावायला येत. कोणाचा झोका सर्वांत उंच जातो किंवा कोणाची उडी सर्वांत लांब जाते अशी शर्यत लागे. यात बऱ्याचदा हॅनाचीच सरशी होत असे.

दुकानाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या घरातल्या मोठ्या हॉलमध्ये हॅना लाल स्कूटर घेऊन आणि जॉर्ज निळी स्कूटर घेऊन शर्यत लावत. थंडीच्या दिवसांत दोघं



बर्फाचा किल्ला बनवताना मुलं.

बर्फाचे किल्ले बनवत आणि बर्फात स्की करीत. पण हॅनाला सगळ्यात आवडायचं ते स्केटिंग. नोव्हे मेस्टोच्या गोठलेल्या तळ्यावर स्वतःभोवती वेगानं गरगर फिरण्याचा सराव करण्यासाठी ती खूप मेहनत घेत असे. मनगटापाशी मऊ केसाळ पांढरी कातडी लावलेला खास स्केटिंगचा लाल पोशाख ती चढवत असे तेव्हा आपण नृत्य करणारी कुणी राजकन्या आहोत अशी कल्पना ती करत असे. तिच्या स्केटिंगला आणि या स्वप्नालाही तिचे आई-वडील, भाऊ आणि मित्रमैत्रिणी टाळ्या वाजवून दाद देत.



स्केटिंगच्या लाल पोशाखात हॅना.

हॅनाचे आई-वडील आठवड्यातले सहा दिवस दुकानात काम करत असल्यामुळे सगळ्या कुटुंबासाठी रविवारची सकाळ ही खास असे. सकाळी जाग आली की जॉर्ज आणि हॅना आपल्या आई-वडिलांच्या उबदार मऊ पांघरुणात शिरत. उन्हाळ्यात रविवारी दुपारी वडील गाडी काढत आणि सगळं कुटुंब जवळपासच्या एखाद्या किल्ल्यावर किंवा गढीमध्ये सहलीला जाई. कधी गावातच राहणारी हेड्डाआत्या आणि लुडविककाकाही बरोबर येत. हिवाळ्यात बर्फावरच्या घसरगाड्यांमधून चक्कर होई किंवा क्रॉस कंट्री स्कीची साहसी सफर होई. हॅना स्की



करण्यात पटाईत होती. नोव्हे मेस्टोपासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात झकास चहा आणि क्रीमचे चविष्ट केक मिळण्याचं एक ठिकाण होतं. आपल्या भावंडांबरोबर स्की करत तिकडे जाताना सगळ्यात धाकटी असलेली हॅनाच सर्वांत पुढे असे.



हॅना आणि जॉर्ज दोघंही लहानपणीच स्कीइंग शिकले होते.

पण १९३८ साल संपत आलं, तेव्हा वातावरणात एक प्रकारची दहशत पसरत असल्याची जाणीव लोकांना व्हायला लागली. त्यांच्या बोलण्यात युद्धाचा विषय यायला लागला. जर्मनीत ॲडॉल्फ हिटलर आणि त्याचे नाझी अनुयायी राज्य करत होते. त्या वर्षाच्या सुरुवातीला हिटलरनं ऑस्ट्रियावर ताबा मिळवला होता. नंतर त्याचं सैन्य चेकोस्लोव्हाकियाच्या काही भागावर चालून गेलं होतं. नाझी सैन्यापासून पळून जाणारे लोक ब्रॅडी कुटुंबाकडे यायला लागले होते आणि पैसे, अन्न आणि राहण्यासाठी आसरा मागत होते. आई-वडील त्यांचं स्वागत करत होते; पण मुलं मात्र गोंधळून गेली होती. हॅनाला प्रश्न पडत होते, 'हे लोक कोण आहेत? ते इकडे का आले? त्यांना आपल्या स्वतःच्या घरी का राहायचं नाहीये?'

रात्री हॅना आणि जॉर्जला झोपायला पाठवून आई-वडील रेडिओपाशी बसत आणि बातम्या ऐकत. बऱ्याचदा त्यांचे मित्रही येत. मग ऐकलेल्या बातम्यांबद्दल सगळे जण रात्री उशिरापर्यंत आपसात चर्चा करत. ''आपण हळू आवाजात बोलू या, म्हणजे मुलं जागी होणार नाहीत,'' आई-वडील सुचवत.

तरीही या लोकांचा आवाज बोलताना चढतच असे आणि चर्चा तावातावानं चालतच. त्या ऐकता येतील अशी एक गुप्त जागा दिवाणखान्याच्या बाहेर होती. अंधाऱ्या हॉलमधून हॅना आणि जॉर्ज मांजराच्या पावलांनी तिथपर्यंत येत, तेव्हा खालच्या लाकडी तक्तपोशीची होणारी करकर मोठ्या माणसांना ऐकूही जात नसे. तिथूनच मुलांना ऑस्ट्रियामधल्या नव्या ज्यूविरोधी कायद्यांबद्दल कळलं. जर्मनीत झालेल्या क्रिस्टालनाख्त[७]बद्दलही कळलं. त्या रात्री नाझी गुंडांच्या टोळ्यांनी ज्यू वस्तीत जाऊन घरांच्या आणि दुकानांच्या खिडक्या फोडल्या होत्या. ज्यूंची देवळं जाळली होती. ज्यू लोकांना रस्त्यात मारहाणही केली होती.

''असं इथे होणार नाही, हो ना?'' हॅना आपल्या भावाच्या कानात कुजबुजत म्हणाली.



''शूः! आपण बोललो तर ते त्यांना ऐकू जाईल आणि ते आपल्याला झोपायला परत पाठवतील!'' जॉर्ज म्हणाला.

एका रात्री शेजारच्या मिस्टर रोट्नी एक भलतीच सूचना केली. ''युद्ध होणार हे आपल्याला आता कळून चुकलंय. ज्यूंनी इथे राहणं आता धोक्याचं आहे. आपण सगळे नोव्हे मेस्टो सोडून, चेकोस्लोव्हाकिया सोडून अमेरिकेला किंवा कॅनडाला किंवा दुसरीकडे कुठेही जाऊ या. ...फार उशीर होण्याच्या आत निघू या.''

बाकीच्या सगळ्यांना हे ऐकून धक्काच बसला. ''तुम्हांला वेड लागलंय का, मिस्टर रोट्?'' एकानं विचारलं, ''हे आपलं घर, आपलं गाव आहे. आपण सगळे इथलेच आहोत.'' आणि तो विषय तिथेच संपला.

दिवस असे वाईट असूनही ब्रॅडी कुटुंबीयांनी १९३९ या नव्या वर्षाचं स्वागत करण्याचा निश्चय केला. नववर्षाच्या आदल्या रात्री टर्की, सॉसेज, सलामी[८] आणि पुडिंगची मेजवानी झाल्यावर भविष्य ओळखण्याचा पारंपरिक खेळ मुलं खेळली. जवळपासच्या गावांमधून हॅना आणि जॉर्ज यांची आते, चुलत वगैरे भावंडं आली होती. प्रत्येकाला अक्रोडाचं आतला गर काढून घेतलेलं अर्धुक दिलं गेलं. सगळ्यांनी आपापल्या अर्धुकात एकेक छोटी मेणबत्ती लावली. मग एक मोठा पाण्याचा टब खोलीत आणला गेला आणि प्रत्येकानं आपली अक्रोडाची चिमुकली होडी त्यात सोडली. अकरा वर्षांच्या जॉर्जची होडी पाण्यात डगमगली, गोलगोल फिरली आणि शेवटी एका बाजूला कलंडून थांबली. त्याची मेणबत्ती मात्र जळत राहिली. आठ वर्षांच्या हॅनानंही आपली होडी सोडली. काही क्षण ती पाण्यावर स्थिरावली आणि मग ती थरथरली; एका बाजूला कलंडली. मेणबत्ती पाण्यावर पडली आणि विझून गेली.

७ क्रिस्टालनाख्त - ९ नोव्हेंबर १९३८ची रात्र. या रात्री जर्मनीतील ज्यू वस्त्या, उद्योगधंदे, दुकानं इत्यादींवर हल्ले करून मोठा विध्वंस करण्यात आला आणि ज्यू लोकांना रस्त्यात खेचून मारहाण करण्यात आली.

८ सलामी - डुकराच्या मांसापासून केलेला आणि दीर्घकाळ टिकू शकणारा खाद्यपदार्थ.

# टोकियो

## मार्च २०००

ज्या दिवशी सूटकेस टोकियोमध्ये पोचली, त्या दिवसापासून फ्युमिको आणि मुलं तिचाच विचार करायला लागली. दहा वर्षांच्या अकिराला एरवी विनोद करायला आणि चिडवाचिडवी करायला आवडे. त्यालाही 'अनाथ झाल्यावर कसं वाटत असेल?' असा प्रश्न पडला. वयानं थोडी मोठी असलेली माइको सिंक्रोनाइज्ड स्विमिंगमध्ये तरबेज होती आणि तिला पार्ट्या आवडत. मात्र सूटकेस समोर असली की ती एकदम गप्प व्हायची. आपल्या मित्रमैत्रिणींपासून तोडून आपल्याला कुठेतरी दूर पाठवलं तर काय होईल, असे विचार तिच्या मनात यायला लागत.

त्या संग्रहालयात सूटकेस ही एकमेव वस्तू कोणाच्यातरी नावाशी जोडलेली होती. सूटकेसवरच्या तारखेवरून फ्युमिकोनं आणि मुलांनी अंदाज केला की, हॅनाला आउसश्वित्सला पाठवलं तेव्हा ती तेरा वर्षांची असणार. ''म्हणजे माझ्यापेक्षा एका वर्षानं लहान,'' एक मुलगी म्हणाली. ''माझ्या मोठ्या बहिणीएवढीच,'' अकिरा म्हणाला.

फ्युमिकोनं आउसश्वित्स संग्रहालयाला पुन्हा पत्र लिहिलं आणि ही सूटकेस जिच्या मालकीची होती, त्या मुलीबद्दल काही माहिती मिळू शकेल का असं विचारलं. तिकडून 'नाही' असं उत्तर आलं. हॅनाबद्दल फ्युमिकोला जेवढी माहिती होती तेवढीच त्यांनाही होती. फ्युमिकोनं हे मुलांना सांगितलं.



''दुसरीकडे प्रयत्न करून पहा,'' माइको म्हणाली. ''सोडून देऊ नकोस,'' अकिरा म्हणाला. सगळी मुलं एका सुरात प्रोत्साहन देत म्हणाली, ''शोध घेत रहा!'' फ्युमिकोनंही त्यांना तसं वचन दिलं.

फ्युमिकोनं इस्राईलमधल्या 'याद वाशेम' ह्या हॉलोकॉस्ट संग्रहालयाला पत्र लिहून विचारलं. त्यांचं उत्तर आलं, 'आम्ही हॅना ब्रॅडी नावाच्या मुलीबद्दल कधीच काही ऐकलेलं नाही.' त्यांनी फ्युमिकोला वॉशिंग्टन डी.सी.च्या हॉलोकॉस्ट संग्रहालयाकडे चौकशी करण्याची सूचना केली. फ्युमिकोनं लगेच वॉशिंग्टनला पत्र लिहिलं; पण तिकडूनही हेच उत्तर आलं, 'हॅना ब्रॅडी नावाच्या मुलीबद्दल आम्हांला काहीही माहिती नाही.' हे फारच निराशा करणारं होतं.

आणि अचानक, आउसश्वित्सच्या संग्रहालयाकडून फ्युमिकोला एक चिठ्ठी आली. त्यांना काहीतरी सापडलं होतं. एका यादीमध्ये त्यांना हॅनाचं नाव सापडलं होतं. त्यावरून ती 'थेरेजिअनश्टाट्' नावाच्या ठिकाणाहून आउसश्वित्सला आल्याचं स्पष्ट होत होतं.

# नोव्हे मेस्टो

## १९३९

१५ मार्च १९३९ रोजी हिटलरच्या नाझी सैन्यानं चेकोस्लोव्हाकियाच्या उरलेल्या प्रदेशावरही आक्रमण केलं आणि ब्रॅडी कुटुंबाचं आयुष्यच कायमचं बदलून गेलं. नाझींनी जाहीर केलं की, 'ज्यू लोक दुष्ट, धोकेबाज असतात आणि त्यांची सावलीही अपशकुनी असते.' त्यामुळे यापुढे नोव्हे मेस्टोमधल्या ज्यूंना वेगळे कायदे लावले जाणार होते.

दिवसातल्या ठरावीक वेळीच ज्यूंना घराबाहेर पडता येणार होतं. ठरावीक दुकानांमध्ये आणि ठरावीक वेळीच त्यांना खरेदी करता येणार होती. ज्यूंना प्रवास करता येणार नव्हता. त्यामुळे जवळच्या गावांमधल्या लाडक्या आत्या-मावश्यांना, काका-मामांना आणि आजी-आजोबांना भेटणं बंद! या नव्या कायद्यानुसार ब्रॅडी कुटुंबाच्या मालकीचं जे जे होतं - कलात्मक वस्तू, दागिने, किमती काचवस्तू, बँकेचं पासबुक वगैरे सगळं - त्याबद्दल सगळी माहिती नाझींना द्यावी लागली. आई-वडिलांनी अत्यंत महत्त्वाची कागदपत्रं घाईघाईनं माळ्यावरच्या लाकडी फळ्यांखाली लपवून ठेवली. ज्यू नसलेल्या मित्रांकडे वडिलांनी आपला पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह आणि आईच्या चांदीच्या वस्तू दडवून ठेवल्या. घरातला रेडिओ मात्र मध्यवर्ती कचेरीत एका नाझी अधिकाऱ्याच्या हाती सुपूर्द करावा लागला.





नाझींचे निर्बंध वाढल्यानंतर हॅना आणि जॉर्ज एकमेकांच्या अधिक जवळ आले.

एक दिवस 'हिमगौरी आणि सात बुटके' हा चित्रपट पाहण्यासाठी हॅना आणि जॉर्ज चित्रपटगृहामध्ये रांगेत उभे होते. तिकीट-खिडकीजवळ पोचताच त्यांना पाटी दिसली, 'ज्यूंना प्रवेश नाही.' त्यांचे चेहरे लाल झाले, डोळ्यांची आग व्हायला लागली. दोघंही तसेच उलटपावली घराकडे निघाले. खूप निराश झालेली आणि चिडलेली हॅना घरात शिरली. "आपल्याला असं का करतात? आपण सिनेमा का पाहायचा नाही? त्या पाटीवर लिहिलेलं मी का म्हणून ऐकायचं?" आई-वडिलांनी गंभीर होऊन एकमेकांकडे पाहिलं. त्यांच्याकडे या प्रश्नांची सोपी उत्तरं नव्हती.

प्रत्येक आठवड्यात ज्यूंवर एक नवं बंधन लादलं जात होतं. ज्यूंनी बागेत जायचं नाही, मैदानावर खेळायला जायचं नाही. लवकरच हॅनाला व्यायामशाळेतही जाता येईनासं झालं. अगदी स्केटिंगचं तळंही बंद झालं. तिचे सगळे मित्रमैत्रिणी बिगर ज्यू होते. सुरुवातीला हॅनाप्रमाणेच तेही बुचकळ्यात पडत. शाळेत अजूनही सगळी मुलं नेहमीसारखीच एकत्र बसत; वर्गात आणि मैदानात एकमेकांच्या खोड्या

काढत; मजा करत. ''काय वाटेल ते झालं तरी आपण नेहमी एकत्र राहू,'' हॅनाची जवळची मैत्रीण मारिया म्हणे. ''आम्ही कोणाशी खेळायचं ते दुसऱ्या कुणी आम्हांला सांगितलेलं आम्हो नाही खपवून घेणार!''

पण जसजसे महिने उलटत चालले, तसे हॅनाचे मित्रमैत्रिणी, अगदी मारियासुद्धा, शाळेनंतर आणि सुट्टीच्या दिवशीही तिच्याकडे येईनाशी झाली. मारियाच्या आई-वडिलांनी तिला हॅनापासून दूर राहण्याबद्दल बजावलं. मारियानं ज्यू मुलीबरोबर मैत्री केली, तर नाझी आपल्या अख्ख्या कुटुंबालाच शिक्षा करतील, अशी त्यांना भीती वाटत होती. हॅनाला भयंकर एकटं वाटायला लागलं.

अशी एकेक मैत्री तुटण्याबरोबर आणि एकेका नव्या बंधनामुळे हॅना आणि जॉर्जला आपलं जग जणू आणखी लहान झालंय असं वाटे. त्यांना राग येई; वाईट वाटे. मन निराश होई. ''आम्ही काय करू? कुठे जाऊ?'' ते आई-वडिलांना विचारत.

आई आणि वडील मुलांचं मन रमवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. वेळ आनंदात घालवण्याचे नवनवे मार्ग शोधायला मदत करीत. ''आपलं नशीब चांगलं म्हणून आपल्या घराला मोठी बाग आहे. तिथे तुम्हांला लपंडाव खेळता येईल. झाडाला झोका बांधता येईल. नवे खेळ शोधता येतील. आपल्या कोठीच्या खोलीत गुप्तहेराचा खेळ खेळता येईल. गुप्त भुयार शोधून काढता येईल. अभिनय करून शब्द ओळखण्याचा खेळ खेळता येईल. तुम्ही दोघं एकमेकांना आहात हे नशीब समजा!''

आपण एकमेकांना आहोत हे सुदैव मानून दोघं एकमेकांशी खेळत खरे; पण तरीही, आपल्याला हव्या त्या गोष्टी करता येत नाहीत, जिथे जावंसं वाटतं तिथे जाता येत नाही, याचं त्यांना वाईट वाटतच होतं. वसंत ऋतूतल्या एका दिवशी, छान उन्हं पडलेली असताना घरामागच्या कुरणामध्ये दोन्ही भावंडं कंटाळून गवताशी चाळा करत बसली होती. अचानक हॅनाला रडू फुटलं, ''शी! हे रे काय!'' ती ओरडली. ''मला नाही आवडत! सगळं आधी होतं तसंच मला हवंय!'' तिनं जमिनीतून मूठभर गवत



उपटलं आणि हवेत भिरकावलं. मग आपल्या भावाकडे पाहिलं. आपल्याला जेवढा त्रास होतो आहे तेवढाच त्यालाही होतो आहे, हे तिला ठाऊक होतं. ''थांब इथेच,'' जॉर्ज म्हणाला, ''मला एक कल्पना सुचलीये.'' तो गेला आणि कागदाचं पॅड, पेन, रिकामी बाटली आणि एक फावडं घेऊन काही मिनिटांतच परत आला.

''हे कशाला?'' हॅनानं विचारलं.

''आपल्याला ज्या ज्या गोष्टींचा त्रास होतोय, त्यांच्याबद्दल आपण लिहून काढलं तर आपल्याला बरं वाटेल,'' तो म्हणाला.

''हा बावळटपणा आहे!'' हॅना म्हणाली. ''तसं करून आपल्याला खेळाचं मैदान परत मिळणार नाही आणि बागही परत मिळणार नाही. मारियासुद्धा परत मिळणार नाही!''

पण जॉर्जनं खूपच आग्रह केला. किती झालं तरी तो मोठा भाऊ होता, आणि हॅनाकडे वेळ घालवण्यासाठी त्याहून जास्त चांगली कल्पनाही नव्हती. मग पुढे कितीतरी वेळ दोन्ही मुलांनी आपलं सगळं दुःख कागदावर उतरवलं. जास्ती करून हॅना बोलत होती आणि जॉर्ज लिहून काढत होता. त्यांना ज्या गोष्टींची आठवण होत होती, ज्यांचा राग येत होता, त्या सगळ्यांची त्यांनी यादी केली. मग हे दुष्ट दिवस संपल्यानंतर ज्या गोष्टी करायला आवडतील, ज्या जवळ असायला आवडतील, जिथे जिथे जायला आवडेल अशा सगळ्या गोष्टींची यादी केली.

एवढं झाल्यावर जॉर्जनं त्या कागदांची बारीक गुंडाळी केली. जवळच्या बाटलीत घालून तिला बूच लावलं. मग घराकडे जाताजाता दोघंही वाटेतल्या झोपाळ्यापाशी थांबले. तिथे हॅनानं एक मोठा खड्डा खणला. आपलं दुःख आणि निराशा लपवून ठेवण्यासाठी तिनं ती खास जागा केली. जॉर्जनं खड्ड्याच्या तळाशी ती बाटली ठेवली आणि हॅनानं वरून माती घालून खड्डा पुन्हा भरून टाकला. निदान त्या दिवसापुरतं तरी जग त्यांना थोडं हलकं आणि प्रसन्न वाटलं.

बाहेर जे घडत होतं त्याचा अर्थ लावणं सगळ्यांनाच फार अवघड जात होतं. विशेषतः घरातला रेडिओ गेल्यामुळे ते जास्तच कठीण झालं होतं. हिटलरच्या नवनव्या दुष्ट कारवायांबद्दलच्या बातम्यांसाठी आई-वडील लंडन रेडिओ केंद्रावरून रात्री आठ वाजता प्रसारित होणाऱ्या बातम्यांवरच अवलंबून असायचे. पण सगळ्या ज्यूंनी रात्री आठ वाजण्यापूर्वी घरी परतलं पाहिजे असा हुकूम होता. रेडिओ ऐकण्याचीही सक्त मनाई होती. कोणताही हुकूम मोडला तर अतिशय कडक शिक्षा होत असे. अटक होण्याची भीती प्रत्येकालाच वाटत होती.

नाझींच्या नियमांमधून पळवाट काढण्यासाठी वडिलांनी एक युक्ती शोधून काढली. चर्चच्या मोठ्या घड्याळाची जबाबदारी ज्या माणसाकडे होती, तो त्यांचा जुना मित्र होता. संध्याकाळ झाल्यावर घड्याळ पंधरा मिनिटं मागे आणण्याची विनंती त्यांनी त्या मित्राला केली. रोज तेवढ्या वेळात ते शेजाऱ्यांकडे जाऊन बातम्या ऐकत आणि आठ वाजता - खरं तर सव्वाआठ वाजता - सुरक्षित घरी परत येत. शहराच्या चौकात गस्त घालणाऱ्या नाझी शिपायाला या गोष्टीचा कधीच पत्ता लागला नाही. आपली योजना यशस्वी झाल्याचा वडिलांना फारच आनंद झाला. दुर्दैवानं रेडिओवर येणाऱ्या बातम्या वाईट होत्या. फारच वाईट. नाझींना प्रत्येक लढाईत जय मिळत होता. प्रत्येक आघाडीवर त्यांची आगेकूच चालू होती.





हॅना आणि जॉर्ज

# टोकियो

## मार्च २०००

थेरेजिअनश्टाट्. आता फ्युमिको आणि मुलांना हॅना थेरेजिअनश्टाट्हून आउसश्वित्सला आली होती एवढं तरी कळलं होतं. फ्युमिकोचा उत्साह वाढला. हॅनाबद्दलची पहिलीच पक्की माहिती तिच्या हाती आली होती. पहिला सुगावा.

चेकोस्लोव्हाकियातल्या तेरेत्सिन या गावाला नाझींनी थेरेजिअनश्टाट् हे नाव दिलं होतं. ते अगदी छोटंसं गाव होतं. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बांधलेले दोन मोठे किल्ले तिथे होते. युद्धकैद्यांना आणि राजकीय कैद्यांना तिथे डांबत असत. चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केल्यानंतर नाझींनी तेरेत्सिन गावाचं थेरेजिअनश्टाट् घेट्टो[१] मध्ये रूपांतर केलं. भोवती भिंती घातलेल्या आणि कडक पहारा असलेल्या त्या लहानशा तुरुंगासारख्या गावात आपली घरंदारं सोडायला भाग पाडलेल्या असंख्य ज्यूंना कोंडून ठेवलेलं होतं. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एकूण १,४०,००० ज्यूंना तिथे ठेवलं गेलं होतं. त्यात १५,००० मुलं होती.

फ्युमिको रात्री उशिरापर्यंत जागून थेरेजिअनश्टाट्बद्दल मिळेल तेवढी माहिती वाचून काढत होती. सेंटरच्या अंधाऱ्या इमारतीत फक्त तिच्याच ऑफिसमधला दिवा जळत होता.

थेरेजिअनश्टाट्मध्ये ज्या भयंकर गोष्टी घडल्या त्यांबद्दल तिला बरंच काही



कळलं. तिथे राहणाऱ्या सर्व ज्यूंना काही काळानंतर तिथूनही हलवून, आगगाड्यांमध्ये घालून पूर्वेकडच्या जास्त भयानक छळछावण्यांमध्ये पाठवण्यात आलं. या छळछावण्यांमधली परिस्थिती इतकी भीषण होती की, 'मृत्युछावण्या' म्हणूनच त्या ओळखल्या जात.

पण थेरेजिअनश्टाट्मध्ये धैर्याच्या स्फूर्तिदायक घटनाही घडल्या होत्या, हेही फ्युमिकोला कळलं. तिथे असलेल्या मोठ्या माणसांमध्ये काही लोक खूप खास होते: थोर चित्रकार, प्रसिद्ध संगीतकार, इतिहासकार, तत्त्वज्ञ, फॅशन डिझायनर, सामाजिक कार्यकर्ते वगैरे. ते थेरेजिअनश्टाट्मध्ये होते कारण ते ज्यू होते. भिंतीआडच्या त्या वसाहतीत फार मोठी गुणवत्ता, शिक्षण आणि ज्ञान एकत्र आलेलं होतं. मोठा धोका पत्करून नाझींच्या नकळत या बंद्यांनी लहानांसाठी आणि मोठ्यांसाठीही वेगवेगळे विषय शिकवणं, शिकणं, कार्यक्रम निर्माण करणं आणि ते सादरही करणं अशी तपशीलवार योजना गुप्तपणे तयार केली होती आणि ती प्रत्यक्षातही आणली होती. त्यांना आपल्या विद्यार्थ्यांना दाखवून द्यायचं होतं की, युद्ध चालू असलं तरी, भोवतीचं वातावरण उदासवाणं असलं तरीही जग सुंदरच असतं आणि प्रत्येक माणसाला त्या सौंदर्यात भर घालता येणं शक्य असतं.

थेरेजिअनश्टाट्मध्ये मुलांना चित्र काढायला आणि रंगवायला शिकवलं जात असे अशीही माहिती फ्युमिकोला कळली. आणि चमत्कार असा की, या मुलांनी काढलेली ४,५०० चित्रं युद्धातून वाचली होती. फ्युमिकोच्या छातीत धडधडलं. या चित्रांमध्ये हॅना ब्रॅडीनं काढलेली काही, निदान एखादं तरी चित्र असेल?

१ घेट्टो - पूर्वी ज्यू लोकांना गावात इतरांबरोबर राहू देत नसत. त्यांना वेगळी वस्ती करून राहावं लागे. त्या वस्तीला 'घेट्टो' म्हणत. आजही बहुसंख्य जनतेला नको असलेली अल्पसंख्य माणसं राहतात त्या भागाला 'घेट्टो'च म्हटलं जातं.

# नोव्हे मेस्टो

## शरद ऋतू १९४० ते वसंत ऋतू १९४१

शरद ऋतू येताना हवेत बोचरी थंडी घेऊन आला, आणि त्याचबरोबर आणखी काही बंधनं आणि कष्टही घेऊन आला.

हॅना आता तिसरीत जाणार होती. त्याच वेळी नाझींनी हुकूम काढला की, यापुढे ज्यू मुलांना शाळेत जाता येणार नाही. आई-वडिलांनी ही दुष्ट बातमी सांगितल्यावर हॅना रडवेली होऊन म्हणाली, ''आता मला माझे मित्र-मैत्रिणी कधीच भेटणार नाहीत! मोठी झाल्यावर मला शाळेत शिक्षिका होता येणार नाही!'' आपण वर्गासमोर उभ्या आहोत आणि सगळा वर्ग आपलं बोलणं लक्ष देऊन ऐकतो आहे, असं स्वप्न हॅना नेहमी पाहत आली होती.

आई-वडिलांनी मात्र दोन्ही मुलांचं शिक्षण चालूच ठेवण्याचा निर्धार केला. सुदैवानं त्यांच्याकडे पुरेसे पैसे होते. त्यामुळे हॅनाला शिकवण्यासाठी त्यांनी जवळच्याच गावातल्या एका तरुण मुलीची आणि जॉर्जचे शिक्षक म्हणून एका वृद्ध निर्वासित प्राध्यापकांची नेमणूक केली.

घरातलं वातावरण आनंदी असावं अशी आईची धडपड असे. ''गुड मॉर्निंग, हॅना!'' दिवस उगवला की ती म्हणे, ''नाश्त्याची वेळ झाली. तुला 'शाळे'ला उशीर व्हायला नकोय ना?'' रोज सकाळी जेवणाच्या टेबलाशी हॅनाला तिची नवी शिक्षिका



भेटत असे. ही तरुण शिक्षिका खूप प्रेमळ होती आणि हॅनाला वाचायला, लिहायला, गणितं करायला उत्साह वाटावा म्हणून ती खूप धडपड करायची. तिनं एक लहान फळा आणला होता. तो ती खुर्चीवर टेकवून ठेवत असे. ती हॅनाला अधूनमधून फळ्यावर खडूनं चित्रं काढायची आणि खडूची धूळ झटकायची परवानगी देत असे. पण या शाळेत खेळगडी नव्हते, खोड्या नव्हत्या, मधली सुट्टी नव्हती. लक्ष देऊन धडा शिकणं हॅनाला जड जात होतं. हिवाळ्याचे अंधारे दिवस[१०] ब्रॅडी कुटुंबीयांच्या जगाला घेरत चालले होते.

वसंत ऋतू आला आणि आकाश कोसळलं. सगळ्यांना ज्यांची दहशत वाटत असे, त्या 'गेस्टापो' या हिटलरच्या गुप्त पोलिसांनी मार्च १९४१मध्ये आईला अटक केली.

घरी आईच्या नावानं एक पत्र आलं. त्यात जवळच्याच इग्लो या गावात असलेल्या गेस्टापो मुख्यालयामध्ये सकाळी नऊ वाजता हजर होण्याचा तिला हुकूम



आनंदात असलेली हॅना, जॉर्ज आणि आई.

होता. वेळेत पोचायचं, तर घरातून मध्यरात्रीच निघावं लागणार होतं. सगळी आवराआवर करून आणि घरच्यांचा निरोप घेऊन निघण्यासाठी तिला फक्त एक दिवसाचा अवधी दिला होता.

आईनं हॅनाला आणि जॉर्जला दिवाणखान्यात बोलावलं. कोचावर बसून तिनं त्यांना जवळ घेतलं. ती म्हणाली, ''मला काही दिवसांसाठी दूर जावं लागतंय.'' हॅना आईला जास्तच बिलगली. आई पुढे म्हणाली, ''मी नसताना शहाण्यासारखं वागायचं, बरं का! बाबाचं नीट ऐकायचं, तो सांगेल तसं वागायचं. मी पत्र लिहीत जाईन. तुम्ही मला उत्तर पाठवाल ना?''

जॉर्जनं नजर वळवली. हॅना शहारली. मुलांना इतका धक्का बसला होता की, त्यांना उत्तरच सुचेना. यापूर्वी आई त्यांना सोडून कधीच गेली नव्हती.

त्या रात्री आईनं हॅनाला अंथरुणात झोपवलं, तेव्हा हॅनानं तिला घट्ट धरून ठेवलं. अगदी लहान असताना आई तिच्या केसांमधून जशी हलकेहलके बोटं फिरवायची, तशी आताही फिरवत होती. आईनं हॅनाची आवडती अंगाई पुन्हापुन्हा म्हटली. आईच्या गळ्याला मिठी मारूनच हॅना झोपी गेली.

सकाळी तिला जाग आली तेव्हा आई गेलेली होती.

१० हिवाळ्याचे अंधारे दिवस - जसंजसं उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाजवळ जावं तशी दिवसरात्रीची लांबी कमीजास्त होत जाते. या प्रदेशांमध्ये उन्हाळ्यात पहाटे चारच्या सुमारास उजाडतं आणि रात्री अकरा वाजेपर्यंत दिवस असतो. त्याउलट हिवाळ्यात सकाळी नऊनंतर उजाडतं आणि दुपारी चार वाजताच अंधार पडायला लागतो.



# टोकियो

## एप्रिल – २०००

टोकियोच्या ऑफिसमध्ये एक चपटं पार्सल पोस्टानं आलं, तेव्हा फ्युमिकोचा त्यावर विश्वासच बसेना. आज ज्याला 'चेक प्रजासत्ताक' म्हणतात, त्या देशातल्या तेरेत्सिन घेट्टो संग्रहालयाला तिनं काहीच आठवड्यांपूर्वी पत्र लिहिलं होतं. हॅना ब्रॅडीच्या जास्त जवळ जाता येईल, असं काहीही मिळवण्यासाठी मुलं आणि आपण स्वतः किती उत्सुक आहोत, ते तिनं त्या पत्रात लिहिलं होतं. खरं तर, हॅनाबद्दल आपल्याला काहीच माहिती नसल्याचं संग्रहालयाच्या लोकांनी पूर्वीच सांगितलं होतं. पण त्यांना छावणीतल्या ज्यू मुलांनी काढलेल्या आणि छावणीत दडवून ठेवलेल्या चित्रांच्या मोठ्या संग्रहाबद्दल माहीत होतं. त्यातली अनेक चित्रं आता प्राग शहरातल्या संग्रहालयामध्ये मांडून ठेवलेली आहेत.

फ्युमिकोनं पार्सल उघडलं. ती इतकी उत्तेजित झाली होती की, पार्सल उघडताना तिचे हात थरथरत होते. पार्सलमध्ये पाच चित्रांचे फोटो होते. एकात बागेचं आणि तिथल्या बाकाचं रंगीत चित्र होतं. दुसऱ्यात नदीकाठी सहलीला आलेल्या लोकांचं चित्र होतं. बाकीची चित्रं पेन्सिल आणि चारकोलने केलेली होती. एक झाडाचं, दुसरं शेतात गवत वाळवणाऱ्यांचं आणि तिसरं गाडीतून सूटकेस घेऊन उतरणाऱ्या प्रवाशांचं. प्रत्येक चित्राच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात नाव होतं - हॅना ब्रॅडी.



थेरेजिअनश्टाट्मध्ये असताना हॅनानं काढलेलं एक चित्र.



# नोव्हे मेस्टो

## शरद ऋतू १९४१

आईला वचन दिलेलं असल्यामुळे हॅना शहाण्यासारखं वागण्याचा खूप प्रयत्न करत होती. वडिलांना जमेल तेवढी मदत करत होती आणि अभ्यासही करत होती. बोश्का ही घरची स्वयंपाकीण हॅनाच्या आवडीचे पदार्थ करण्यासाठी धडपडत असायची आणि तिला गोड पदार्थ चमचाभर जास्त वाढायची. पण हॅनाला आईची - विशेषतः रात्रीच्या वेळी - फार आठवण यायची. हॅनाचे केस आई जसे कुरवाळायची, तसे कुरवाळणं दुसऱ्या कोणालाच जमत नसे. कोणीच तिच्या सारखी अंगाई गाऊ शकत नसे. आणि आईचं ते मोठ्यानं खळखळून हसणं! त्याची तर सर्वांनाच फार आठवण यायची.

जर्मनीमधल्या राव्हन्सब्रुक नावाच्या गावात आई होती हे मुलांना कळलं. तिथे खास महिलांसाठी छळछावणी होती.

''ते लांब आहे का?'' हॅनानं वडिलांना प्रश्न केला.

''ती परत कधी येणार?'' जॉर्जनं विचारलं.

वडिलांनी मुलांना सांगितलं की, आईला तिथून सोडवण्यासाठी मी शक्य ते सगळे प्रयत्न करतो आहे.

एक दिवस हॅना आपल्या खोलीत वाचत बसलेली असताना तिला बोश्काच्या हाका ऐकू आल्या. हॅनानं लक्षच न द्यायचं ठरवलं. तिला घरातली कसलीही कामं

करण्याची इच्छा नव्हती. आणि उत्साहानं वाट पाहावी, असं दुसरंही काही नव्हतं. पण बोश्का हाका मारतच होती. ''हॅना! हॅना? कुठे आहेस तू? लवकर ये! पोस्ट ऑफिसात खास तुझ्यासाठी काहीतरी आलंय, बघ जा!''

हे ऐकल्याबरोबर हॅनानं हातातलं पुस्तक खाली टाकलं. ती ज्याची अगदी मनापासून वाट पाहत होती, तेच असेल का? ती झपाट्यानं घरातून बाहेर पडली आणि पोस्ट ऑफिसकडे धावत सुटली. जाळीच्या खिडकीपाशी पोचताच तिनं विचारलं, ''माझ्यासाठी काही आहे का?'' पलीकडच्या बाईनं एक छोटं तपकिरी रंगाचं पाकीट खिडकीतून बाहेर सरकवलं. त्यावरचं आईचं हस्ताक्षर पाहताक्षणी हॅनाच्या छातीत धडधडलं. पाकीट उघडताना तिची बोटं थरथरली. आत एक तपकिरी रंगाचा छोटा बदाम होता. तो ब्रेडचा बनवलेला होता आणि त्यावर 'एच.बी.' अशी आद्याक्षरं कोरलेली होती. सोबत एक पत्रही होतं.


माझी लाडाची हॅना,

तुला वाढदिवसासाठी माझ्या खूप शुभेच्छा. या वर्षी मेणबत्त्यांवर फुंकर घालण्यासाठी मला तुला मदत करता येणार नाही, याचं मला खूप वाईट वाटतंय. पण तुझ्या हातातल्या ब्रेसलेटमध्ये घालायला हा बदाम करून पाठवते आहे. आता तुला तुझे कपडे लहान होतात का? डॅडीला आणि जॉर्जला म्हणावं, माझ्या या मोठ्या झालेल्या मुलीसाठी नवे कपडे शिवून द्यायला आत्याला सांगा. मला तुझी आणि जॉर्जची सारखी आठवण येते. मी ठीक आहे. तू शहाण्यासारखी वागतेस ना? मला पत्र लिहिशील का? तुझा आणि जॉर्जचा अभ्यास चांगला चालला असेल असं मी समजते. मी बरी आहे.


हॅनिश्का, बाळा, मला तुझी फार आठवण येते. ही बघ, मी तुझी पापी घेते आहे.

तुझी आई
मे १९४१, राव्हेन्सब्रुक





पकडून नेल्यानंतर हॅनाच्या आईनं ब्रेडपासून बनवलेल्या या भेटवस्तू घरी पाठवल्या होत्या.




ज्यूंना घराबाहेर पडताना हा पिवळ्या रंगाचा कापडी तारा आपल्या कपड्यांवर लावावा लागे.

हॅनानं डोळे मिटून घेतले आणि तो तपकिरी बदाम मुठीत घट्ट पकडला. आपली आई जणू शेजारी उभी आहे असं तिला वाटू लागलं.

त्या वर्षीच्या शरद ऋतूनंतर आणखी एक धक्का बसला. एक दिवस वडील कापडाचे तीन चौकोनी तुकडे घेऊन आले. प्रत्येक तुकड्यावर पिवळा डेव्हिडचा तारा होता आणि त्याच्या मध्यभागी लिहिलं होतं : 'यूडऽ' म्हणजे ज्यू.

स्वयंपाकघरातल्या टेबलाच्या खणातून कात्री काढत वडील म्हणाले, "मुलांनो, या. आता हे तारे कापायचे आणि ते आपल्या कोटावर लावायचे. जेव्हा आपण बाहेर जाऊ तेव्हा आपल्याला तो तारा लावूनच जावं लागेल."

"का?" हॅनानं विचारलं, "लोकांना माहितीच आहे, आपण ज्यू आहोत ते!"

"आपल्याला हे करावं लागणार आहे," वडील म्हणाले. ते इतके नाराज, त्रासलेले आणि थकलेले दिसत होते की हॅना आणि जॉर्ज यांनी त्यांच्याशी वाद घातला नाही.

त्या दिवसानंतर हॅना फारसं घराबाहेर पडेनाशीच झाली. बाहेर जाताना तो पिवळा तारा लावण्याचं टाळण्यासाठी ती काहीही करायला तयार असे. तिला त्या ताऱ्याचा तिटकारा वाटे. ते होतंच अपमानास्पद आणि संकोच वाटण्यासारखं. मुलांना वाटे की, आमची बाग, आमचं तळं, शाळा आणि मित्र आम्हांला सोडावे लागले, हे पुरेसं नाही का? पण आता जेव्हाजेव्हा ती घराबाहेर पडत, तेव्हा तेव्हा तो तारा त्यांच्या कोटावर टाचलेला असे.

गावातल्या एका ज्यू माणसाला हे हुकूम पाळायचे नव्हते. सगळ्या नियमांचा आणि बंधनांचा त्याला वीट आला होता. १९४१मधल्या सप्टेंबरच्या एका संध्याकाळी तो घराबाहेर पडला, तेव्हा त्याला थोडं साहस दाखवावंसं वाटलं. चौकोनी कापडातून तो तारा वेगळा कापून घेण्याऐवजी त्यानं तो अख्खा चौकोनी तुकडाच आपल्या कोटावर लावला. नोव्हे मेस्टोच्या प्रमुख नाझी अधिकाऱ्याच्या नजरेतून ही लहानशी बंडखोरीही सुटली नाही. तो संतापला. त्यानं हुकूम सोडला: नोव्हे मेस्टोमधून सर्व ज्यूंना हाकलून द्यावं; ताबडतोब!

दुसऱ्याच दिवशी सकाळी एक मोठी, काळ्या रंगाची गाडी ब्रॅडी कुटुंबाच्या घरासमोर येऊन थांबली. एक नाझी अधिकारी ती चालवत होता. घाबरलेले चार ज्यू पुरुष अंग चोरून आधीच आत बसले होते. दरवाजा ठोठावला गेला. वडिलांनी दरवाजा उघडला. हॅना आणि जॉर्ज त्यांच्या मागेच बिलगून उभे होते. नाझी अधिकाऱ्यानं वडिलांवर खेकसत ताबडतोब बाहेर येण्याचा हुकूम केला. हॅना आणि जॉर्ज यांचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना. दोघंही अवाक होऊन, भेदरून, काही न बोलता तसेच उभे राहिले. वडिलांनी मुलांना जवळ घेतलं, धीर धरायला सांगितलं, आणि मग तेही निघून गेले.

# टोकियो

## वसंत ऋतू २०००

हॅनाची चित्रं पाहून फ्युमिकोला खूपच आनंद झाला. हॅना कशी मुलगी होती ते समजून घेण्यासाठी मुलांना या चित्रांची मदत होईल, हे तिला ठाऊक होतं. हॅनाच्या



थेरेजिअनश्टाट्मध्ये असताना हॅनानं काढलेल्या चित्रांपैकी आणखी एक चित्र.



जागी आपणच आहोत अशी कल्पना करणं आणि तिची परिस्थिती समजून घेणं आता त्यांना जास्त सोपं होणार होतं. फ्युमिकोचा हा अंदाज बरोबर होता.

सेंटरमध्ये येणाऱ्या स्वयंसेवक मुलांनी आता आपलं लक्ष हॅनावर अधिकच केंद्रित केलं. आपल्याला जे शिकायला मिळतं आहे ते इतर मुलांनाही सांगावं, या उद्देशानं त्यांनी माइकोच्या पुढाकारानं एका गटाची स्थापना केली. आपल्या या क्लबचं 'स्मॉल विंग्ज' असं नाव त्यांनी ठेवलं. महिन्यातून एकदा एक वार्तापत्र प्रकाशित करण्याची त्यांची योजना होती. प्रत्येक मुलाकडे काहीतरी जबाबदारी दिलेली होती. मोठ्या मुलांनी लेख लिहायचे, अगदी छोट्यांनी चित्रं काढायची, बाकीच्यांनी कविता लिहायच्या. हॉलोकॉस्टबद्दल आणि हॅनाच्या शोधाबद्दल इतर मुलांनाही कळावं म्हणून फ्युमिकोच्या मदतीनं त्यांनी आपलं वार्तापत्र अनेक शाळांमध्ये पाठवलं.



स्मॉल विंग्ज

या सगळ्यापेक्षाही, हॅना कशी दिसत होती याबद्दल त्यांना जास्त उत्सुकता होती. ज्या मुलीची गोष्ट समजून घेण्यासाठी सगळे जण इतका खटाटोप करत होते, तिचा चेहरा त्यांना पाहायचा होता. फ्युमिकोच्या लक्षात आलं की, हॅनाचा फोटो जर मिळवता आला तर ती खरीखुरी मुलगी म्हणून मुलांना जास्तच जिवंत वाटेल. आपला शोध चालूच ठेवण्याचा फ्युमिकोनं निश्चय केला.

चित्रं, एक पायमोजा, एक बूट, एक स्वेटर आणि अर्थातच हॅनाची सूटकेस, एवढ्या वस्तू मिळाल्यावर आता 'मुलांच्या नजरेतून हॉलोकॉस्ट' हे प्रदर्शन मांडण्याची वेळ आली आहे, असं फ्युमिकोला वाटलं.



# नोव्हे मेस्टो

## हिवाळा १९४१-१९४२

आता त्या घरात फक्त दोघं मुलंच राहिली. आई-वडील नव्हतेच. जॉर्जनं आपल्या दहा वर्षांच्या बहिणीच्या खांद्याभोवती हात टाकला आणि तिची काळजी घेण्याचं वचन तिला दिलं. बोश्कानं त्यांच्यासाठी चांगलंचुंगलं खायला करून आणि गमतीदार गोष्टी सांगून त्यांचं मन रमवण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा उपयोग झाला नाही. मुलं उदास आणि अतिशय भेदरलेली होती.

वडिलांच्या अटकेनंतर काही तासांनी दरवाजावर पुन्हा थाप पडली. हॅनाच्या छातीत धडधडलं. जॉर्जनं अवंढा गिळला. आता ते कोणासाठी आले असतील? पण जेव्हा मुलांनी दरवाजा उघडला, तेव्हा त्यांना समोर लुडविककाका उभे दिसले. त्यांचे लाडके लुडविककाका.

''मला आत्ताच बातमी कळली,'' एका हातानं हॅनाला आणि दुसऱ्या हातानं जॉर्जला जवळ घेत काका म्हणाले. ''आता तुम्ही दोघांनीही माझ्याकडे चलायचं. आपल्या घरी, तुमच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांमध्ये.''

लुडविककाका धर्मानं ख्रिश्चन होते आणि त्यांनी मुलांच्या हेड्डाआत्याशी लग्न केलं होतं. ते स्वतः ज्यू नसल्यामुळे नाझींपासून त्यांना तसा धोका नव्हता. पण तरीही हॅना आणि जॉर्जला आपल्या घरी नेण्याचं मोठं धाडसच ते करत होते. जे कुणी ज्यूंना

मदत करतील, त्यांना भयंकर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा गेस्टापोनं दिला होता.



जॉर्ज, हॅना व तिची बाहुली- नाना.

लुडविककाकांनी मुलांना आपल्या अगदी आवडत्या वस्तू बरोबर घ्यायला सांगितलं. हॅना पाच वर्षांची असल्यापासून तिच्याकडे तिच्याएवढीच मोठी 'नाना' नावाची बाहुली होती, ती तिनं घेतली. जॉर्जनं कुटुंबाचे सगळे फोटो घेतले. दोघांनीही एकेक सूटकेस भरून कपडे घेतले. हॅनानं मोठी तपकिरी रंगाची सूटकेस घेतली. पूर्वी घरच्यांबरोबर प्रवासाला जाताना तिनं ती वापरली होती. तिचं ठिपक्याठिपक्यांचं अस्तर तिला फार आवडत असे. सगळं सामान बांधल्यावर मुलांनी दिवे मालवले आणि दरवाजा बंद केला.

त्या रात्री आत्यानं आणि काकांनी हॅनाला एका मोठ्या पलंगावर झोपवून अंगावर पिसांचं मऊ पांघरूण घातलं, ''तुझे आई-बाबा परत येईपर्यंत आम्ही तुझा सांभाळ करू, हं!'' ते धीर देत म्हणाले, ''रात्री तुला जाग आली, तर आम्ही हॉलच्या त्या बाजूलाच आहोत.''

पण दिवे मालवल्यानंतरही बराच वेळपर्यंत हॅना त्या अनोळखी अंधाराकडे बघत जागीच होती. तो बिछाना अनोळखी होता आणि भोवतीचं संकटांनी भरलेलं जग उलटंपालटं झाल्यासारखं वाटत होतं. भ्यायलेल्या हॅनाच्या मनात विचार आला: पुढे काय होणार आहे? अखेर, तिनं डोळे मिटले आणि तिला झोप लागली.



सकाळी हॅनाला जाग आली तीच कुत्र्याच्या जोरजोरात भुंकण्याच्या आवाजानं. तिच्या छातीत धस्स झालं. आता काय झालं असेल? मग तिला तो आवाज ओळखू आला. तो सिल्व्हाचा, तिच्या वूल्फहाउन्ड कुत्रीचा, आवाज होता. सगळं गाव ओलांडून ती हॅना आणि जॉर्जला शोधत आली होती. हॅनाला वाटलं: निदान कोणीतरी खऱ्या मैत्रीला जागणारं आहे. तेवढंच छोटंसं समाधान.



हॅना व जॉर्ज त्यांच्या सिल्व्हा या वूल्फहाऊन्ड जातीच्या कुत्रीसोबत.



हॅना आणि तिचे शूर व प्रेमळ लुडविककाका.

हेड्डाआत्या आणि लुडविककाकांचं घर लहान, पण आरामशीर होतं. घरामागे सुरेखशी बाग होती. त्या भागातली शाळा घरापासून जवळच होती. आपापली दप्तरं घेऊन हसतखेळत शाळेला जाणारी मुलं हॅना आणि जॉर्जला रोज दिसत होती. ''मला पण जायचंय शाळेत!'' चिडचिड करत हातपाय आपटून हॅना म्हणे. पण त्याबाबत कोणीही काहीही करू शकत नव्हतं.

नंतरच्या काही महिन्यांमध्ये मुलांना कशा ना कशात गुंतवून ठेवण्याचा खूप प्रयत्न हेड्डाआत्या आणि लुडविककाकांनी केला. जॉर्ज तासन्तास लाकडं फोडत असे. हॅना पुस्तक वाचत असे आणि खेळत असे. व्हेरा आणि यिरी या आपल्या आतेबहिणींशीही तिचं चांगलं जमत असे. कधीकधी ती त्यांच्याबरोबर चर्चलाही जाई.



दुपारच्या जेवणासाठी हॅना आणि जॉर्ज रोज आपल्या स्वतःच्या घरी जात. बोश्का त्यांचे लाड करी, जवळ घेऊन पापे घेई. ''तुम्हांला व्यवस्थित जेवायला घालून तुमची तब्येत सांभाळेन, असं वचन मी तुमच्या आईला दिलं आहे,'' ती त्यांना नेहमी म्हणे. इग्लोच्या गेस्टापो तुरुंगात कैद करून ठेवलेल्या वडिलांचं पत्र दर काही आठवड्यांनी येई. जॉर्ज त्यातला चांगला भाग तेवढा हॅनाला वाचून दाखवी. तुरुंगातलं आयुष्य किती कष्टाचं असतं हे खरंखरं कळण्याइतकी आणि तिथून सुटण्याची आपल्या वडिलांना किती तीव्र इच्छा आहे हे समजण्याइतकी हॅना अजून मोठी झालेली नाही, असं त्याला वाटत होतं.

पण नाझींना मात्र तुरुंगात धाडण्याएवढी ती मोठी वाटत होती.



हॅना आणि जॉर्ज शेतीकामातही मदत करत असत.



थेरेजिअनश्टाट्मध्ये असताना हॅनानं काढलेलं शेतात काम करणाऱ्या लोकांचं चित्र.




# नोव्हे मेस्टो

## मे १९४२

एक दिवस आत्या आणि काकांच्या घरी एक नोटीस आली. १४ मे १९४२ या दिवशी, नोव्हे मेस्टोपासून पन्नास किलोमीटर अंतरावर असलेल्या त्रेबिक नावाच्या डिपोर्टेशन सेंटर[११]वर हॅना आणि जॉर्ज ब्रॅडी या दोघांनी हजर व्हावं, असा हुकूम त्यात होता. नेमक्या याच गोष्टीची भीती लुडविककाकांना वाटत आलेली होती. त्यांनी हॅनाला आणि जॉर्जला आपल्या अभ्यासिकेमध्ये बोलावलं. ही वाईट बातमी जितकी हलकीफुलकी करून सांगता येईल तितकी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ''तुम्हांला सहलीला जायचं आहे. दोघांना एकत्र!'' ते म्हणाले. ''तुम्ही जिथे जाणार आहात तिथे इतर अनेक ज्यू लोक आहेत. खेळायला खूप मुलं आहेत. तिथे कदाचित तुम्हांला कोटावर पिवळा ताराही लावावा लागणार नाही.''

जॉर्ज आणि हॅना फारसं काही बोलले नाहीत. पुन्हा नव्या ठिकाणी जाणं, आत्याला आणि काकांना सोडून जाणं त्यांच्या जिवावर आलं होतं.

हॅना घाबरली होती. मुलांचं सामान बांधायला मदत करण्यासाठी जेव्हा बोश्का आली, तेव्हा हॅनानं तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. ''आमचे आई-बाबा कुठे आहेत? आम्हांला त्यांना कधी भेटता येईल? आम्ही कुठे जाणार आहोत? आम्हांला बरोबर काय काय नेता येईल?'' या प्रश्नांना बोश्काकडे काही उत्तरं नव्हती. ती हॅनाला



JÜDISCHE KULTUSGEMEINDE IN PRAG
ŽIDOVSKÁ NÁBOŽENSKÁ OBEC V PRAZE

Herrn, Frau, Fräulein
Pan, paní, slečna

Brady Hanna

100.436

Neustadtl Mhr.

12

Diese Vorladung ist mit Genehmigung der Zentralstelle für jüdische Auswanderung Prag (Dienststelle des Befehlshabers der Sicherheitspolizei beim Reichsprotektor in Böhmen und Mähren) als Reisegenehmigung anzusehen.

Tato obsílka platí za cestovní povolení na základě schválení Zentralstelle für jüdische Auswanderung Prag (Dienststelle des Befehlshabers der Sicherheitspolizei beim Reichsprotektor in Böhmen und Mähren).

Über Weisung der Zentralstelle für jüdische Auswanderung Prag haben Sie sich

Z nařízení Zentralstelle für jüdische Auswanderung Prag dostavte se

am - dne 30. IV. 1942

um - v 10 Uhr - hod.

in - do Trebitsch

einzufinden.

Jede vorgeladene Person hat mitzubringen

1. Geburtschein,
2. Bürgerlegitimation (Kennkarte oder einen anderen Beleg über die Staatsbürgerschaft),
3. diese Vorladung.

Neben diesen Personaldokumenten hat jede Person sämtliche Lebensmittelkarten mitzubringen.

Každá předvolaná osoba přinese s sebou

1. rodný list,
2. občanskou legitimaci (průkaz totožnosti nebo jiný úřední doklad o státní příslušnosti),
3. toto předvolání.

Kromě těchto osobních dokladů, přinese každá osoba všechny potravinové lístky s sebou.

Um die vorgeschriebene Vorladungsstunde einhalten zu können, werden Sie den

Abyste dodržel(a) hodinu, na kterou jste byl(a) předvolán(a), použijete vlaku, který odjíždí

29.4.42 um - v 18'03 Uhr - hod.

von - z Neustadtl über Saar

abgehenden Zug benützen.

Zur Rückreise müssen Sie, den

K návratu musíte nastoupiti do vlaku, který opouští

um - v 16'38 Uhr - hod.

vom Vorladungsort abgehenden Zug benützen.

místo předvolání.

Kinder bis zu 4 Jahren müssen nicht persönlich erscheinen, doch müssen ihre Eltern oder verantwortl. Aufseher, sowohl die Personaldokumente, als auch diese Vorladung und die Lebensmittelkarte vorlegen. Kranke und alte Personen, die nicht persönlich erscheinen können, müssen neben allen Dokumenten ein amtsärztliches Zeugnis vorlegen lassen. Dieses Zeugnis muß eine genaue Diagnose der Krankheit enthalten.

Děti do 4 let se nemusí osobně dostaviti, avšak jejich rodiče nebo jejich zodpov. dozorce musí předložiti jak jejich osobní doklady, tak i toto předvolání a všechny potravinové lístky. Nemocné a staré osoby, které se nemohou osobně dostaviti, dají za sebe předložiti všechny doklady a mimo to vysvědčení úředního lékaře. Toto vysvědčení musí obsahovati přesnou diagnosu nemoci.

JÜDISCHE KULTUSGEMEINDE IN PRAG
ŽIDOVSKÁ NÁBOŽENSKÁ OBEC V PRAZE

हॅनाच्या हद्दपारीची नोटीस बजावणारे कागदपत्र. त्यावर हद्दपारीची तारीख ३० एप्रिल होती पण त्याची अंमलबजावणी १४ मे रोजी झाली.



म्हणाली, ''मीसुद्धा नोव्हे मेस्टो सोडून शेतावर राहणाऱ्या माझ्या भावाकडे जाणार आहे.''

पलंगाखालून हॅनानं ठिपक्यांचं अस्तर असलेली मोठी तपकिरी सूटकेस काढली. आपली स्लीपिंग बॅग[१२] तिनं आत घातली. कितीही दूर गेलं तरी ह्या स्लीपिंग बॅगमुळे घराचा सुगंध आपल्याबरोबर राहील, असं तिला वाटत होतं. जॉर्जनंही तसंच केलं. थोडी सलामी आणि साखर पुड्यांत बांधून ते कपड्यांच्या घड्यांमध्ये ठेवले. शिवाय आठवण म्हणून आणखीही काही वस्तू घेतल्या.

आपल्या दोघा भाच्यांना असं दूर पाठवताना लुडविककाकांना अतिशय वाईट वाटतं होतं. त्यांनी एका बग्गीवाल्याला मुलांना डिपोर्टेशन सेंटरवर नेऊन सोडायला सांगितलं. स्वतः सोबत जाण्याची त्यांची हिंमत झाली नाही. त्यांनी आणि आत्यानं मुलांना निरोप देताना आपल्या डोळ्यांतले अश्रू लपवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. युद्ध संपल्यानंतर तुम्ही घरी परत याल, तेव्हा आम्ही तुमची वाट पाहत नोव्हे मेस्टोमध्येच असू, असं त्यांनी मुलांना वचन दिलं. बग्गीवाल्यानं घंटी वाजवली आणि बग्गी घरापासून दूर निघाली तेव्हा कोणीच एकही अक्षर बोललं नाही.

काही तासांनी बग्गीवाल्यानं हॅना आणि जॉर्जला एका गोदामाच्या प्रचंड इमारतीसमोर सोडलं. फाटकासमोरच्या रांगेत दोघं उभे राहिले. नोंदणीच्या टेबलापाशी ते पोचले, तेव्हा तिथल्या त्रासिक चेहऱ्याच्या एका सैनिकाला त्यांनी आपली नावं सांगितली. सैनिकानं त्यांना त्या कोंदट, अंधाऱ्या इमारतीकडे जायला सांगितलं.

इमारतीच्या आतल्या भागात जमिनीवर चटया अंथरलेल्या होत्या. एका कोपऱ्यात जवळजवळ घातलेल्या दोन चटया शोधून हॅना आणि जॉर्ज बसले. भोवती बघितल्यावर त्यांच्या लक्षात आलं की, तिथे मुलं जवळपास नव्हतीच. शेकडो ज्यू स्त्री-पुरुष थेरेजिअनश्टाट् नावाच्या ठिकाणी जाण्याची वाट बघत बसले होते. त्या सर्वांना आपापली गावं आणि घरं सोडून तिथे यायला भाग पाडलं गेलं होतं.

बरोबर आणलेले खाण्याचे पदार्थ खाऊन आणि त्या चटयांवर झोपून दोन्ही

मुलांनी त्या गोदामाच्या इमारतीत चार दिवस आणि चार रात्री काढल्या. काही मोठी माणसं त्यांच्याशी प्रेमानं वागण्याचा प्रयत्न करीत असली, तरी हॅना आणि जॉर्ज यांना कुणाशी फारसं बोलावंसं वाटत नव्हतं. एकमेकांच्या सोबतीनं पुस्तक वाचत, गप्पा मारत, झोप काढत आणि घराचा विचार करत त्यांनी वेळ काढला. १६ मे १९४२ रोजी याच गोदामाच्या इमारतीत थोड्या कँडी आणि मेणबत्तीचा एक तुकडा, एवढ्या वस्तूंनिशी हॅना ब्रॅडीनं आपला अकरावा वाढदिवस साजरा केला.

११ डिपोर्टेशन सेंटर - जिथून ज्यू कैद्यांना दुसऱ्या देशातल्या छळछावणीत पाठवलं जाई ते ठिकाण.

१२ स्लीपिंग बॅग - सहलीला जाताना किंवा प्रवासात झोपण्यासाठी वापरण्याची मऊ आणि उबदार पिशवी. हिच्यात शिरल्यावर वेगळ्या पांघरुणाची गरज पडत नाही.



# टोकियो

## जून २०००

फ्युमिकोला वाटलं होतं त्यापेक्षा कितीतरी जास्त लोकांनी 'मुलांच्या नजरेतून हॉलोकॉस्ट' या प्रदर्शनाला भेट दिली; मुलांनी आणि मोठ्या माणसांनीही. त्यांच्यापैकी अनेकांना हॉलोकॉस्टची कहाणी प्रथमच कळत होती. फ्युमिकोला अपेक्षा होती त्याप्रमाणे तिनं गोळा केलेल्या वस्तूंमुळे आणि त्या वस्तूंनी सांगितलेल्या कहाणीमुळे तो सारा दुःखद इतिहास प्रेक्षकांना जास्तच खरा वाटत होता.

लोकांना तिथे मांडलेले बूट, झायक्लॉन बी गॅसचा कॅन आणि स्वेटर यामध्ये रस होताच, पण त्यांचं लक्ष वेधून घेत होती ती सूटकेस. मुलं आणि त्यांचे आई-बाबा त्या सूटकेसभोवती गोळा होत होते आणि तिच्यावर लिहिलेला मजकूर वाचत होते: हॅना ब्रॅडी, १६ मे १९३१, अनाथ. 'स्मॉल विंग्ज' क्लबच्या छोट्या सदस्यांनी लिहिलेल्या कविता ते वाचत होते; थेरेजिअनश्टाट्मध्ये हॅनानं काढलेल्या चित्रांचं कौतुक करत होते. ''तुम्हांला तिच्याबद्दल आणखी माहिती कळली आहे का? तिचं पुढे काय झालं? ती दिसायला कशी होती?'' पाहुणे विचारत होते.

हॅनाचा फोटो मिळवण्याचे प्रयत्न दुप्पट जोरानं करण्याचा निर्धार फ्युमिकोनं केला. जगात कुठेतरी कोणीतरी आपल्याला मदत करणारं असेलच. फ्युमिकोनं तेरेत्सिन संग्रहालयाला पुन्हा एकदा पत्र लिहिलं. त्यांचं पुन्हा तसंच उत्तर आलं,

‘आम्ही तुम्हांला पूर्वीच सांगितलं आहे की, हॅना ब्रॅडी नावाच्या मुलीबद्दल आम्हांला काही माहिती नाही.’

फ्युमिकोला मात्र हे पटत नव्हतं. तिनं स्वतःच तेरेत्सिनला जायचं ठरवलं.



# डिपोर्टेशन सेंटर

## मे १९४२

चौथ्या दिवशी सकाळी जोरात शिट्टी वाजली आणि एक नाझी सैनिक गोदामाच्या इमारतीमध्ये शिरला. खेकसणाऱ्या सुरात तो हुकूम सोडत असताना हॅना आणि जॉर्ज अंग चोरून, एकमेकांना चिकटून कोपऱ्यात बसले होते.

‘‘एका तासाच्या आत सर्वांनी रेल्वेमार्गापाशी यायचं आहे. प्रत्येकाला फक्त एक सूटकेस बरोबर घेता येईल. फक्त पंचवीस किलो. एक ग्रॅमही जास्तीचा चालणार नाही. सरळ रांग करायची. बोलणं बंद. जसं सांगितलंय तसंच करायचं.’’

त्याचा आवाज किती कठोर, किती भीतिदायक होता! हॅना आणि जॉर्जनी भराभरा आपलं सामान आवरलं. भोवतीच्या मोठ्या माणसांनी त्यांना मदत केली आणि त्यांना निघण्यासाठी तयार केलं. त्यांच्या मनात आलं: आईबापांविना एकट्यानं असा कठीण प्रवास करायचा. बिच्चारी मुलं!

सैनिकांच्या करड्या नजरेच्या धाकात सर्वांनी गोदाम सोडलं आणि एक रांग करून ते रेल्वेमार्गाच्या बाजूला उभे राहिले. बाहेरच्या स्वच्छ सूर्यप्रकाशातून हॅना आणि जॉर्जने हातात सूटकेस घेऊन गाडीच्या अंधाऱ्या डब्यात पाऊल टाकलं. डबा गच्च भरेपर्यंत माणसं आत येतच होती. मग दारं धाडकन बंद झाली आणि गाडी निघाली.

# तेरेत्झिन

## जुलै २०००

थेरेजिअनश्टाट्. चेकोस्लोव्हाकियातल्या तेरेत्सिन या शहराला नाझींनी दिलेलं नाव. हॅनाच्या सूटकेसचं गूढ उकलायचं असेल तर या गावाला जायला हवं, हे फ्युमिकोच्या लक्षात आलं होतं. पण जायचं कसं? चेक प्रजासत्ताक जपानपासून हजारो मैल दूर होतं. विमानाचं तिकीट काढायला खूप पैसे लागणार होते, आणि तेवढी पुंजी फ्युमिकोजवळ नव्हती.

पण या वेळी नशीब फ्युमिकोच्या बाजूला होतं. इंग्लंडमध्ये हॉलोकॉस्टवर एक परिषद भरणार होती. फ्युमिकोला तिथे येण्याचं आमंत्रण मिळालं. तिथून तिला चेक प्रजासत्ताकाच्या राजधानीला - प्रागला - विमानानं अगदी थोड्या वेळात जाता येणार होतं. प्राग ते तेरेत्सिन हा रस्त्यानं जेमतेम दोन तासांचा प्रवास होता. फ्युमिकोला तिकडे जायची आता अगदी घाई झाली.

११ जुलै २००० या दिवशी सकाळी फ्युमिको बसमधून तेरेत्सिनच्या मुख्य चौकात उतरली. कोणत्याही छानशा साध्या गावासारखंच ते गाव दिसत होतं. रुंद रस्त्याच्या कडेला झाडांची रांग होती आणि बाल्कन्यांमध्ये फुलांच्या कुंड्या ठेवलेल्या नीटनेटक्या तीन मजली इमारती होत्या. पण फ्युमिकोचं या कशाकडेच लक्ष नव्हतं. आपलं काम करण्यासाठी तिच्यापाशी फक्त एक दिवस होता. रात्री तिला प्रागला परत



जावं लागणार होतं. तिला जपानला परत घेऊन जाणारं विमान दुसऱ्या दिवशी सकाळीच होतं.

फ्युमिकोनं तेरेत्सिनला येण्यापूर्वी फोन वगैरे केला नव्हता. संग्रहालयाला भेट देण्याची वेळही ठरवलेली नव्हती. चौकात समोरच असलेली दुमजली, आडवी, फिकट पिवळ्या रंगाची इमारत तिला दिसली. तेच 'तेरेत्सिन घेट्टो संग्रहालय' होतं.

फ्युमिकोनं संग्रहालयाचा जाडजूड दरवाजा उघडला आणि ती आतल्या थंड कॉरिडॉरमध्ये शिरली. सगळीकडे जरा विचित्रच शांतता होती. कुठे गेले सगळे? बाजूच्या ऑफिसच्या खोलीत तिनं डोकावून पाहिलं. खोली रिकामीच होती. संपूर्ण इमारतीत कोणी दिसत नव्हतं.



फ्युमिकोनं भेट दिलेलं सध्याचं तेरेत्सिन.

काय झालं होतं? फ्युमिकोला कळेना. जेवणाची सुट्टी म्हणून सगळे बाहेर गेले असतील का? ते शक्य नव्हतं, कारण सकाळचे दहाच वाजले होते. फ्युमिको बाहेर आली आणि चौकातल्या बागेत बाकावर बसलेल्या एका गृहस्थाला तिनं विचारलं, ''मला जरा मदत कराल का? या संग्रहालयात मला मदत करू शकणाऱ्या कुणालातरी मी शोधते आहे.''

''आज तुम्हांला तिथे कोणीच भेटणार नाही. तुमच्या दुर्दैवानं आज सुट्टी आहे आणि तिथे काम करणारे सगळे जण कुठेकुठे बाहेर गेले आहेत.''



# थेरेजिअनश्टाट्

## मे १९४२

आगगाडीचा प्रवास विशेष काही न घडता तसा शांततेत पार पडला. सगळी माणसं गप्प गप्प, आपल्या विचारात आणि आपलं पुढे काय होणार या भीतीमध्ये हरवलेली होती. काही तासांनी गाडी अचानक थांबली. दरवाजे धाडकन उघडले गेले आणि दरवाजाजवळ उभे असलेल्या भयभीत प्रवाशांना स्टेशनच्या नावाची पाटी दिसली - बोहुसोविक् स्टेशन. आपली सूटकेस घेऊन जॉर्जबरोबर डब्यातून बाहेर पडलेल्या हॅनाचे डोळे सूर्यप्रकाशाने दिपल्यामुळे किलकिले झाले. सगळ्यांना आपापलं सामान घेऊन थेरेजिअनश्टाट् किल्ल्यापर्यंत चालत जाण्याचा हुकूम सुटला.


तसं ते अंतर काही किलोमीटरचंच होतं, पण मुलांचं सामान आकारानं मोठं आणि वजनानं जड होतं. ओझं कमी करण्यासाठी आतल्या काही गोष्टी इथेच टाकून द्याव्यात, असा विचार हॅना आणि जॉर्जच्या मनात आला. नको, सूटकेसमध्ये असलेली प्रत्येक वस्तू त्यांना त्यांच्या आत्तापर्यंतच्या आयुष्याची आठवण करून देणारी होती आणि म्हणूनच महत्त्वाची होती. शेवटी एक सूटकेस जॉर्जनं उचलली आणि दुसरी काही कैदी ओढून नेत असलेल्या ढकलगाडीवर ठेवली.

तटबंदी असलेल्या किल्ल्याच्या दरवाजापर्यंत हॅना आणि जॉर्ज पोचले आणि रांगेत उभे राहिले. त्यांच्याप्रमाणेच रांगेतल्या प्रत्येकानं छातीवर पिवळा तारा लावलेला होता.

रांगेच्या पुढच्या टोकाला एक सैनिक प्रत्येकाला नाव, वय आणि जन्मगाव विचारत होता. मग मुलं आणि पुरुष यांना एका बाजूला, तर मुली आणि स्त्रिया यांना दुसऱ्या बाजूला पाठवत होता. ''ते कुठे जाताहेत?'' हॅनानं जॉर्जला विचारलं. आपल्याला भावापासून वेगळं व्हावं लागेल, याची तिला इतर कशाहोपेक्षा जास्त भीती वाटत होती. ''मला तुझ्याबरोबर राहता येईल?'' हॅनानं विचारलं. ''चूप, हॅना!'' जॉर्ज बहिणीला म्हणाला. ''हट्ट करू नकोस!''

दोघं रांगेच्या टोकाशी पोचले, तेव्हा तिथल्या सैनिकानं त्यांच्याकडे रोखून पाहिलं. ''तुमचे आई-वडील कुठे आहेत?'' त्यानं विचारलं.

''ते...ते...अं...दुसऱ्या छावणीत,'' जॉर्ज चाचरत म्हणाला. ''आम्हांला ते...कदाचित इथे भेटतील अशी आशा आहे.''



थेरेजिअनश्टाट्मध्ये हॅनानं काढलेलं आगगाडीतून उतरणाऱ्या लोकांचं चित्र.



त्या सैनिकाला गप्पा मारण्यात अजिबात रस नव्हता. त्यानं दोघांची नावं कार्डावर लिहून घेतली. सूटकेस उघडून आत पैसे किंवा दागिने आहेत का ते पाहिलं. मग त्या बंद केल्या. ''डावीकडे!'' त्यानं जॉर्जला हुकूम केला. ''उजवीकडे!'' हॅनाला आज्ञा झाली.

''मी माझ्या भावाबरोबर राहू का?'' हॅनानं विनंती केली.

''चला! ताबडतोब!'' सैनिकानं फर्मावलं.

हॅनाला ज्या गोष्टीची सर्वांत भीती वाटत होती तीच आता घडत होती. जॉर्जनं पटकन तिला जवळ घेतलं. ''काळजी करू नकोस. मला जमलं की मी तुला लगेच शोधून काढीन,'' तो म्हणाला. डोळ्यातलं पाणी आवरून धरत हॅनानं आपली सूटकेस उचलली आणि इतर मुलींच्या मागोमाग ती 'किंडरहाइम[१३] एल४१०' याच्या दिशेनं निघाली. ती बराकीसारखी जागा हेच पुढली दोन वर्षं हॅनाचं घर असणार होतं.

१३ किंडरहाइम - लहान मुलांचे घर किंवा वसतिगृह.

# तेरेत्सिन

## जुलै २०००

फ्युमिकोचा विश्वासच बसेना. ती स्वतःवर आणि स्वतःच्या दुर्दैवावर खूप चिडली. आपण इतक्या दूरपर्यंत यावं आणि आपल्याला मदत करू शकतील असे सगळे जण नेमके सुट्टीवर गेलेले असावेत! या तेरेत्सिन संग्रहालयात यायला आपण इतका चुकीचा दिवसच कसा काय निवडला? इतक्या कशा आपण मूर्ख? आता काय करावं? माथ्यावरच्या सूर्याचं प्रखर ऊन फ्युमिकोला भाजून काढत होतं. निराशेमुळे तिचे डोळे भरून आले आणि गालावरून अश्रू ओघळले.

तिनं पुन्हा एकदा संग्रहालयात जाऊन एक प्रयत्न करण्याचं आणि सगळ्याचा पुन्हा एकदा विचार करण्याचं ठरवलं. कदाचित एखादी वेगळी कल्पना सुचेल!

आतल्या स्वागतकक्षात एका बाकावर फ्युमिको बसली, आणि त्याच वेळी तिला कसलीतरी सळसळ ऐकू आली. हॉलच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या ऑफिसच्या खोल्यांकडून तो आवाज येत असावा. फ्युमिको दबक्या पावलांनी त्या आवाजाच्या दिशेनं गेली. उजवीकडच्या सगळ्यात शेवटच्या खोलीमध्ये तिला एक बाई नाकाच्या शेंड्यावर चष्मा ठेवून, कागदाच्या एका मोठ्या गठ्ठ्यावर ओणवी होऊन काहीतरी शोधत असलेली दिसली.

फ्युमिकोला पाहून चमकलेल्या त्या बाईनं खुर्चीतून जवळजवळ उडीच मारली.



''कोण तुम्ही?'' तिनं विचारलं. ''इथे काय करताहात? संग्रहालय बंद आहे.''

''माझं नाव फ्युमिको इशिओका. थेरेजिअनश्टाट्मध्ये असलेल्या एका लहान मुलीबद्दल माहिती मिळवण्यासाठी जपानहून आले आहे. टोकियोमधल्या आमच्या संग्रहालयात तिची सूटकेस आहे.''

''तुम्ही नंतर कधीतरी आलात तर तुम्हांला कुणाचीतरी मदत मिळू शकेल,'' ती बाई सौजन्यानं म्हणाली.

''पण नंतर नाही येऊ शकणार मी. माझं जपानचं विमान उद्या सकाळी प्रागहून निघणार आहे. हॅना ब्रॅडीला शोधण्यासाठी मला तुम्हीच मदत करा,'' फ्युमिकोनं विनवणी केली.

त्या बाईनं डोळ्यांवरचा चष्मा काढला. समोरच्या तरुण जपानी मुलीकडे निरखून पाहिलं आणि ती किती उत्सुक आणि निश्चयी होती ते तिच्या लक्षात आलं. मग एक उसासा टाकून ती म्हणाली, ''ठीक आहे. तुम्हांला मदत करण्याचा मी प्रयत्न जरूर करेन, पण कसलंही आश्वासन देऊ शकत नाही. माझं नाव लुडमिला.''

# थेरेजिअनश्टाट्
## १९४२-४३

किंडरहाइम एल४१० ही मोठी पण साधी इमारत होती. तिच्यामध्ये दहा झोपण्याच्या खोल्या होत्या. त्या खोल्यांमध्ये वाळलेलं गवत भरलेल्या गोणपाटाच्या गाद्या घातलेले तिमजली पलंग - बंक बेड[१४] - होते आणि एकेका खोलीत वीस मुली होत्या.

युद्धापूर्वी त्या गावाची लोकसंख्या ५००० होती. नाझींनी तेवढ्याच जागेत दसपट माणसं कैद करून कोंबली होती. पुरेशी जागा नाही, पुरेसं अन्न नाही, स्वतःसाठी एखादा क्षणही मोकळा नाही. खूप माणसं, खूप ढेकूण आणि घुशी, आणि छावणीवर क्रूर शिस्त लादून पहारा करणारे खूप नाझी.

हॅनाचं वय लहान असल्यामुळे सुरुवातीच्या काळात तिला इमारतीबाहेर जाण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे तिला जॉर्जलाही भेटता येत नव्हतं. तो थोड्या अंतरावर असलेल्या मुलांसाठीच्या किंडरहाइम एल४१७ मध्ये राहत होता. हॅनाला त्याची फार आठवण येत असे, आणि बाहेर जाण्याची परवानगी असलेल्या मोठ्या मुलींकडे ती सारखी त्याची चौकशी करीत असे. त्या मुलींनी हॅनाला आपल्या पंखांखाली घेतलं होतं. आई-वडिलांविना जगात एकट्या पडलेल्या आणि भावापासूनही दूर असलेल्या या मुलीबद्दल त्यांना भारी वाईट वाटे.



शेजारच्या बंकवरच्या एका मोठ्या मुलीशी हॅनाची मैत्री झाली. बुटकी आणि काळ्या केसांची एला खूप उत्साही होती. ती नेहमी हसत असायची. तिच्याकडे आधारासाठी पाहणाऱ्या हॅनाला कसलीही अडचण असली, तरी ती मदत करायची आणि म्हणूनच तिला हॅनाबरोबर वेळ घालवायला आवडायचं.

ज्या माणसाकडे जेवणाची कुपनं वाटण्याची जबाबदारी होती, त्याला हॅनाबद्दल माया वाटे आणि तिच्या तब्येतीची काळजीही वाटे. हॅनाला नेहमी भूक लागलेली असते, हे त्याला ठाऊक होतं. रेशनवर मिळणारं पाणीदार सूप किंवा काळ्या पावाचा एखादा जास्तीचा तुकडा तिला मिळावा म्हणून तो जादा कुपनं हळूच तिच्याकडे सरकवायला तयार असे. जास्त खायला मिळण्याच्या आशेनं हॅनाच्या पोटात गुरगुर होई आणि तिच्या तोंडाला पाणी सुटे. पण प्रत्येक वेळी ती नम्रपणे 'नको' म्हणून ते जादा कुपन नाकारत असे. एला आणि इतर मोठ्या मुलींनी तिला बजावलं होतं की, नियम मोडताना पकडली गेलीस तर तुझी काही धडगत नाही.

कुटुंबापासून दुरावलेल्या, लहान जागेत डांबलेल्या, पोटाला जेमतेम खायला मिळत असलेल्या त्या मुलींनी अशा वाईट परिस्थितीचाही जास्तीतजास्त चांगल्या प्रकारे उपयोग करून घेण्याची धडपड सुरू केली. बागेमध्ये नाझी सैनिकांकरता फळं, भाज्या आणि फुलांची लागवड केलेली होती. पंधरा वर्षांवरच्या मुली तिथे काम करत. बागेची जबाबदारी सांभाळणारे मिस्टर श्वार्ट्झबार्ट अधूनमधून हॅनाला बागेत येण्याची परवानगी देत. त्यामुळे तिला मोकळ्या हवेत आणि सूर्यप्रकाशात थोडा वेळ घालवता येई. मोठ्या मुलींबरोबर बागेत काम करण्याची संधी मिळाली की तिला फार आनंद होई. शिवाय, एक बोनसही मिळे. एखादी स्ट्रॉबेरी, एखादी घेवड्याची शेंग गुपचूप तिच्या भुकेल्या तोंडात दाखल होई.

पण बहुतेक वेळा हॅनाला आपल्या वयाच्या किंवा त्याहून लहान वयाच्या मुलींबरोबर खोलीतच थांबावं लागे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवणाऱ्या सुपरवायझर बाईचं ऐकावं लागे. या लहान मुलींना रोज पलंगाखालची जागा झाडून-पुसून स्वच्छ

करावी लागे. खरकट्या बश्या आणि मुलींची तोंडंसुद्धा पंपावर धुतली जात. आणि अशा परिस्थितीतही रोज किंडरहाइम एल४१०च्या पोटमाळ्यावर गुप्तपणे अभ्यासवर्ग भरत.


संगीताच्या वर्गात मुली नवी गाणी शिकत. पहारेकऱ्यांना ऐकू जाऊ नये म्हणून त्या अगदी हळू आवाजात गात. रोज वर्ग संपताना एका मुलीला घरी शिकलेलं एक आवडतं गाणं म्हणण्याची संधी दिली जाई. हॅनाची पाळी आली की ती 'स्तोनात्स्का' नावाचं गाणं म्हणे. स्तोनात्स्का म्हणजे शतपाद, शंभर पायाची अळी.

सोपं नसतं तिचं जिणं
शंभर पाय दुखेपर्यंत चालणं
विचार करा, ते असतील किती दुखत!
मग तिनं तर किती करावी कुरकुर!
त्यामुळे, मला जेव्हा रडूरडू होतं
तेव्हा मला तिची आठवण येते.
तिच्या पावलांवर पाऊल ठेवून
चालत असल्याची मी कल्पना करते
आणि मग, मला माझं आयुष्य
खूपच सुखाचं वाटायला लागतं.

तिथे शिवणवर्गही चालत. हॅनानं आयुष्यात कधी शिवणकाम केलं नव्हतं आणि सुईशी जमवून घेणं तिला फारच अवघड जाई. आपल्या हातून बावळटपणे एखादी चूक झाली की ती खिदळत सुटे आणि तिची शिक्षिका तिला दटावून हसू आवरायला सांगे. तरीही, हॅनानं एक निळा ब्लाऊज शिवून तयार केला आणि तिला स्वतःचा मोठा अभिमान वाटला.

पण हॅनाचा सगळ्यात आवडता वर्ग होता कलेचा. तिथे रंग वगैरे साहित्य मिळणं फार अवघड होतं. काही लोकांनी आपल्या सूटकेसमध्ये लपवून थोडंफार साहित्य





नदीकिनारी, छत्रीखाली बसलेल्या लोकांचं हॅनानं काढलेलं चित्र.

आणलं होतं. कधीकधी कुणीतरी मोठा धोका पत्करून नाझी कोठारामधला कागद चोरून आणत असे. दुसरं काहीच मिळालं नाही की साधा सामान बांधण्याचा कागद वापरला जाई. सुरुवातीच्या काळात या ना त्या मार्गानं कुठूनतरी रंगीत पेन्सिली मिळत.

चित्रकलेची शिक्षिका फ्रिड्ल् डिकर-ब्रान्डाइस ही थेरेजिअनश्टाट्मधलीच एक कैदी होती. ती स्वतः प्रसिद्ध चित्रकार होती. तिनं आपल्या विद्यार्थिनींना यथार्थदर्शन आणि पोत यांसारख्या अवघड गोष्टीही शिकवल्या. मुलींनी कधीकधी गंभीर विषयांवरची चित्रंही केली: घेट्टोच्या भिंती, अन्नासाठी रांगेत उभी असलेली माणसं, कैद्यांना नाझी सैनिकांची मारहाण.

पण या सगळ्यापेक्षाही फ्रिड्ल्ची इच्छा होती की, आपल्या वर्गातल्या मुलींनी भोवतीचं दुष्ट वातावरण, थोड्या वेळाकरता का होईना, विसरावं. ''मोकळ्या जागेचा विचार करा,'' तिनं हॅनाला आणि इतर मुलींना सांगितलं. ''स्वातंत्र्याचा विचार करा. आपल्या कल्पनेला मोकळेपणानं धावू द्या. तुमच्या मनात काय आहे ते मला सांगा. ते कागदावर उतरवा.''

कधी ती त्यांना इमारतीच्या छपरावर घेऊन जाई. तिथून त्यांना आकाशाच्या थोडं जवळ जाता येई. भिंतीपलीकडचे, दूर अंतरावरचे डोंगर दिसू शकत. मुलींना पक्ष्यांची आणि फुलपाखरांची, तळ्यांची आणि झोपाळ्यांची स्वप्नं पाहता येत. आणि मग आपल्या पेन्सिली वापरून त्या ती स्वप्नं कागदावर उतरवत.

वर्ग संपले आणि सगळी कामंही संपली की त्या स्मेलिना नावाचा एक पटावरचा बैठा खेळ खेळत. व्यापार या खेळासारखाच हा खेळ होता आणि तेरेत्सिनमध्ये कैदेत असणाऱ्या ओसवाल्ड पॉक नावाच्या एका इंजिनिअरनं तो मुलांसाठी तयार केला होता. त्यात दान पडल्यानंतर खेळाडू ज्या घरांमध्ये पोचत असे ती सगळी छावणीतलीच वेगवेगळी ठिकाणं असत. 'एन्टवेजुंग' म्हणजे कपडे निर्जंतुक करण्याचं केंद्र किंवा सैनिकांच्या बराकी अशी ती ठिकाणं असत. खेळात झालेल्या 'कमाई'तून एखादं हॉटेल वगैरे बांधण्याऐवजी खेळाडू बराकीच्या वरच 'कुम्बाल', म्हणजे लपून बसण्यासाठी अडगळीची खोलीवजा पोटमाळा बांधत. खेळात पैसे म्हणून घेट्टोतल्या नोटिसांचे कागद वापरत आणि त्यांना 'घेट्टो क्रोनन्' म्हणत.

असं थोडंफार मनोरंजन असलं, तरी शेवटी हॅनाला भूक आणि एकटेपण सतावतच होतं. तिला जॉर्जची फारच आठवण येत होती. एक दिवस, घेट्टोचे नियम बदलत असल्याचं जाहीर झालं. मुलींना आठवड्यातून एकदा दोन तासांसाठी बाहेर जाण्याची परवानगी मिळाली.

हॅना धावत चौक ओलांडून तडक मुलांच्या इमारतीत गेली. ''जॉर्ज...जॉर्ज ब्रॅडी!'' तिनं हाका मारल्या. ''माझा भाऊ कुठे आहे? तुम्ही पाहिलंत का माझ्या



भावाला?'' असं प्रत्येकाला विचारत तिनं त्याला खोल्याखोल्यांमधून शोधलं. भावाला भेटण्याची तिला इतकी घाई झाली होती की, तिनं एका बाथरूमचादेखील दरवाजा उघडला, आणि तिला जॉर्ज दिसला. तो तिथे प्लंबरचं काम करत होता. पुन्हा भेटून दोघांना केवढा आनंद झाला! जॉर्जनं आपली हत्यारं खाली टाकली आणि हॅना धावत त्याच्या मिठीत शिरली. दोघं हसली, दोघंही रडली. त्यांच्या तोंडून प्रश्नावर प्रश्न बाहेर पडत होते - ''तुझं कसं चाललंय? आई-बाबांबद्दल काही कळलं का? तुला खायला पुरेसं मिळतं का?''

तेव्हापासून एकमेकांना भेटण्याची एकही संधी त्या भावंडांनी सोडली नाही. जॉर्जनं मोठा भाऊ म्हणून आपली जबाबदारी अगदी गंभीरपणे उचलली. हॅनाचं रक्षण करणं आणि तिला काही त्रास होणार नाही हे बघणं आपलं कामच आहे असं त्याला वाटे. आई-वडील भेटेपर्यंत तो तिला शक्य तेवढं आनंदात ठेवणार होता आणि तिच्या तब्येतीची काळजी घेणार होता.

हॅनासुद्धा जॉर्जसाठी तितकाच जीव टाकत होती. तेरेत्सिनमध्ये राहणाऱ्या कैद्यांना खायला कधीच पुरेसं मिळत नसे. आठवड्यातून एकदा छोटा 'बुख्ता', म्हणजे साधा गोड डोनट मिळत असे. हॅना आपल्या वाट्याचा डोनट कधीच खात नसे. आपला भाऊ शरीरानं ताकदवान आणि स्वभावानं गोड रहावा, म्हणून ती तो जॉर्जला नेऊन देत असे.

हॅनाला दिसत होतं की, थेरेजिअनश्टाट्मध्ये दरदिवशी जास्त जास्त लोक येत होते. सुरुवातीला संपूर्ण चेकोस्लोव्हाकियामधून, आणि नंतर युरोपमधल्या इतरही देशांमधून पुरुष, स्त्रिया आणि मुलं यायला लागली. प्रत्येक वेळी आगगाडीतून नवी माणसं उतरली की हॅना ओळखीचे चेहरे दिसतात का, ते शोधत असे. कधीकधी सगळा धीर गोळा करून ती अनोळखी लोकांपाशी जाई आणि विचारे, ''तुम्ही माझ्या आई-वडिलांना ओळखता का? राव्हन्सब्रुक नावाच्या ठिकाणी तुम्ही गेला होतात का? माझी आई तिथे आहे का? कॅरल आणि मार्केता ब्रॅडीबद्दल तुम्हांला काही माहिती

आहे का?'' आणि प्रेमळ स्वरात, तिच्याबद्दल वाटणारी कीव लपवण्याचा प्रयत्न करत नेहमी एकच उत्तर मिळे, ''नाही गं, बाळ. आम्ही तुझ्या आई-वडिलांना ओळखत नाही. पण त्यांच्याबद्दल आम्हांला काही कळलं, अगदी थोडं जरी कळलं, तरी आम्ही तुला शोधून काढू आणि सांगू.''

एक दिवस मात्र एक ओळखीचा चेहरा दिसला. हॅनाच्या आई-वडिलांची ती जुनी मैत्रीण होती. तिला स्वतःचं मूलबाळ नव्हतं. प्रथम तिला पाहून हॅना खूष झाली. आई-वडिलांच्या अगदी थोडं तरी जवळ नेणाऱ्या, घराची आठवण करून देणाऱ्या कोणत्याही गोष्टीमुळे हॅनाला बरं वाटे. पण एक दिवस अचानक तिच्या लक्षात आलं की, ती जिथेजिथे जाई, तिथेतिथे ती बाई तिची वाटच पाहत असे. हॅना एखाद्या कोपऱ्याशी वळली की समोर ती असेच. ती हॅनाचे गालगुच्चे घेई, पापे घेई. एके दिवशी तर तिने कहरच केला.

''ये, बाळ, इकडे ये,'' ती बाई हात पुढे करून म्हणाली, ''पूर्वी आपण एकत्र किती मजा केली नं? आठवतंय? लाजू नकोस! एकटं वाटून घेऊ नकोस. तू रोज माझ्याकडे आलीस तरी चालेल. मला 'आई' म्हटलंस तरी चालेल.''

''मला माझी आई आहे,'' हॅना फटकन म्हणाली. ''जा तू! मला एकटीला राहू दे!'' त्या बाईला पुन्हा भेटायला हॅना तयार नव्हती. तिला आपल्या आईची खूप तीव्रतेनं आठवण येत होती, आणि दुसरं कोणीही तिची जागा घेऊ शकत नव्हतं.

१४ बंक बेड - दुमजली किंवा तिमजली पलंग.



# तेरेत्सिन
## जुलै २०००

तेरेत्सिन घेट्टो संग्रहालयात लुडमिला आपल्या डेस्कमागे बसली होती आणि खुर्चीच्या कडेवर टेकून बसलेल्या त्या तरुण जपानी मुलीकडे रोखून पाहत होती. आपल्या निर्धारापासून फ्युमिको जरासुद्धा मागे हटणार नव्हती, हे तिच्या चेहऱ्यावरून स्पष्टपणे कळत होतं. लुडमिलाला फ्युमिको आवडली होती आणि त्या हॅना ब्रॅडी नावाच्या मुलीबद्दल जास्त माहिती मिळवण्यासाठी तिला मदत करण्याची तिची इच्छा होती.

लुडमिलानं शेल्फवरचं एक मोठं पुस्तक काढलं. थेरेजिअनश्टाट्मध्ये कैद केलेल्या आणि नंतर पूर्वेकडे धाडल्या गेलेल्या जवळजवळ ९०,००० स्त्रिया, पुरुष आणि मुलांच्या नावांची त्यात यादी होती. दोघी मिळून 'बी' या इंग्रजी मुळाक्षराने सुरू होणारी नावं शोधायला लागल्या. ब्राचोव्हा हर्मिना; ब्राचोव्हा त्सुजाना; ब्राडा तोमास; ब्राडासोव्हा मार्ता; ब्राडलेओवा ज्येंका.

''सापडली!'' लुडमिला ओरडली. आणि खरोखरच तिथे नाव होतं- हॅना ब्रॅडी, १६ मे १९३१.

''तिच्याबद्दल जास्त माहिती मला कुठे मिळेल?'' फ्युमिकोनं विचारलं.

''ते मला सांगता आलं असतं तर बरं झालं असतं,'' लुडमिला म्हणाली.


''पण, हे पहा,'' फ्युमिको बोटानं दाखवत म्हणाली. यादीत हॅनाच्या नावाच्यावर आणखी एक ब्रॅडी होता. ''हे तिच्या घरचं कुणी असेल का?'' फ्युमिकोनं विचारलं. लुडमिलानं जन्मतारखा पाहिल्या. दोन्हींमध्ये तीन वर्षांचं अंतर होतं.

''होय. हा तिचा भाऊ असण्याची बरीच शक्यता आहे. यादी करताना कुटुंबांची नावं एकत्र लिहिण्याची नाझींची पद्धत होती.''

फ्युमिकोच्या लक्षात आणखीही एक गोष्ट आली. हॅनाच्या नावापुढं एक खूण (चेक मार्क) होती. खरं म्हणजे, त्या पानावर प्रत्येक नावापुढे तशी खूण होती- फक्त एक नाव सोडून.

जॉर्ज ब्रॅडीच्या नावापुढे काहीच नव्हतं. याचा काय अर्थ होता?




[illegible]en ke studijním účelům
PAMÁTNÍK TEREZÍN
vzdělávací oddělení

30

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 581 | Wolfenstein Helene | 37581 | Haushalt | 15. 6. 1890 | Gr. Meseritsch Oberstadt 350 | 100716 |
| 582 | Wolfenstein Walter | 37582 | Arbeiter | 19.10. 1913 | Gr. Meseritsch Oberstadt 350 | 100719 |
| 583 | Wolfenstein Sidonie | 37583 | Schneiderin | 10. 4. 1911 | Gr. Meseritsch Oberstadt 350 | 100718 |
| 584 | Schück Ing. Friedrich | 37584 | Masch. Ing. | 23. 6. 1891 | Unter Dobrau 81 | 100646 |
| 585 | Drechsler Simon | 37585 | Kaufmann | 3. 8. [illegible] | Gr. Meseritsch Dalimilg. 36 | 100453 |
| 586 | Schnabel Rudolfine | 37586 | Haushalt | [illegible] 1877 | Unter Dobrau 81 | [illegible] |
| 587 | Schück MUDr. Ottokar | 37587 | Arzt | 4.11. 1894 | Unter Dobrau 81 | [illegible] |
| 588 | Schück Edith | 37588 | Haushalt | 17. 5. 1907 | Unter Dobrau 81 | [illegible] |
| 589 | Schück [illegible] | 37589 | Schülerin | [illegible] | Unter Dobrau 81 | [illegible] |
| 590 | Schück Zdenko | 37590 | Schüler | 31. 7. 1938 | Unter Dobrau 81 | 100650 |
| 591 | Fein Anna | 37591 | Private | 9. 6. 1890 | Neustadtl [illegible] 123 | [illegible] |
| 592 | Lauer Irma | 37592 | Hausgehilfin | 21. 8. 1932 | Teltsch, [illegible] 181 dzt. Trebitsch Iglauer Tor 1 | [illegible] |
| 593 | Thierfeld Emma | 37593 | Haushalt | 13. 3. 1887 | Stadt Saar 63 | 100636 |
| 594 | Schwartz Irene [illegible] | 37594 | Fotografin | 3.10. 1915 | Stadt Saar 63 | [illegible] |
| 595 | Thierfeld Paul | 37595 | Arbeiter | 16. 3. 1935 | Stadt Saar 63 | [illegible] |
| 596 | Brady Georg | 37596 | Schüler | 9. 2. 1928 | Neustadtl [illegible] 13 | 100435 |
| 597 | Brady Hanna | 37597 | Schülerin | 16. 5. 1931 | Neustadtl [illegible] 13 | 100436 |
| 598 | Willisch Anna | 37598 | Haushalt | 27. 1. 1901 | [illegible] | [illegible] |
| 599 | Blum Irene | 37599 | Haushalt | 25.10. 1891 | Gr. Meseritsch Dalimilg. 22 | 100433 |
| 600 | Buchsbaum Elsa | 37600 | Haushalt | 13.12. 1892 | Gr. Meseritsch Dalimilg. 22 | [illegible] |

Av

हॅनाला एक भाऊ असल्याचं फ्युमिकोला या यादीवरून समजलं.

# थेरेजिअनश्टाट्

## १९४३–४४


दिवस आणि महिने उलटत होते तशी थेरेजिअनश्टाट्मधील गर्दी वाढत होती. गाड्या भरून आणखी माणसं सतत येतच होती. त्यामुळे प्रत्येकाच्या वाट्याचं अन्न आणखी कमी झालं आणि माणसं जास्त दुबळी झाली. आजारपणं वाढली. म्हाताऱ्या माणसांना आणि मुलांना सगळ्यात जास्त झळ पोचत होती.

हॅना आणि जॉर्ज घेट्टोत आल्याला एक वर्ष पूर्ण झालं. एके दिवशी जॉर्जचा हॅनाला तातडीचा निरोप आला - ''संध्याकाळी सहा वाजता मला मुलांच्या विभागात येऊन भेट. तू चकित होशील असं काहीतरी सांगायचं आहे.''

जॉर्जला फार वेळ धीर धरवला नाही. हॅना दिसताक्षणीच त्यानं सांगून टाकलं, ''आजी इथे आली आहे. काल रात्रीच.''

आजीला भेटण्याच्या कल्पनेनं मुलांना अतिशय आनंद झाला. त्यांना काळजीही वाटली. त्यांची आजी प्रागमध्ये अतिशय सुखवस्तू, सुसंस्कृत आयुष्य जगत होती. याच आजीनं त्यांना खेळातल्या स्कूटर घेऊन दिल्या होत्या. दोघं शहरात तिच्याकडे जात तेव्हा ती नेहमी त्यांना केळी आणि संत्री खायला देत असे. पण अलीकडे ती बरीच आजारी असे. या भीषण जागेत राहणं तिला कसं झेपेल? फारसं नाहीच झेपणार, हे मुलांच्या लवकरच लक्षात आलं.





थेरेजिअनश्टाट येथील मुलींची छावणी. हॅना इथे राहत होती. सध्या याचं नूतनीकरण झालं आहे.

एका पोटमाळ्यावर बऱ्याच आजारी वृद्धांच्या गर्दीतून मुलांनी आजीला शोधलं. तिथे झोपण्यासाठी फक्त वाळकं गवत अंथरलेलं होतं. जुलै महिना अर्धा संपलेला होता आणि हवेत कमालीचा उकाडा होता. त्या पोटमाळ्यावर जे दिसलं, त्यामुळे मुलं भयचकित झाली. त्यांची अतिशय शालीन, सुस्वभावी आणि रूपानं रुबाबदार आजी आता भयानक दिसत होती. पूर्वी तिचे सुंदर पांढरेशुभ्र केस नेहमीच छान विंचरलेले असत. आता त्यांच्या जटा झाल्या होत्या. कपडे फाटलेले आणि मळलेले होते. हॅना तिला म्हणाली, ''हे बघ, तुझ्यासाठी मी स्वतः काढलेलं एक चित्र आणलं आहे.'' तिच्या म्हाताऱ्या चेहऱ्यावर थोडं हसू उमटेल अशी आशा हॅनाला वाटली; पण आजीला धड मानही वळवता येत नव्हती. मग हॅनानं चित्राची घडी घातली आणि त्याचा पंखा करून, त्यानं वारा घालत ती आजीला म्हणाली, ''आराम कर, आजी.'' आजीला बरं वाटावं म्हणून आपण काहीतरी करताहोत, याचं हॅनाला फार बरं वाटलं.

थेरेजिअनश्टाट्मध्ये म्हाताऱ्या माणसांना सर्वांत कमी आणि सर्वांत खराब अन्न दिलं जात होतं, हे हॅनाला लवकरच कळून चुकलं. आजीला जे खायला मिळे ते अजिबात पुरेसं नसे आणि अनेकदा त्यात किडेही पडलेले असत. शिवाय औषधं तर नव्हतीच. जमेल तेव्हा मुलं आजीला भेटायला जात, आपण बनवलेल्या वस्तू तिला देत, शिकलेली गाणी तिला म्हणून दाखवत. "हे वाईट दिवस लवकर संपतील," जॉर्ज तिला दिलासा देत असे. "आपल्या तब्येती चांगल्या राहायला हव्यात असं आई-बाबांनी बजावलंय," हॅना म्हणे.

पण तीनच महिन्यांत आजी मरण पावली. हॅना आणि जॉर्ज वगळता बाकी कोणाच्या ते फारसं लक्षातही आलं नाही. अवतीभोवती सगळीकडे मृत्यूच होता. इतकी माणसं इतक्या वेगानं मृत्युमुखी पडत होती की, स्मशानही अपुरं पडत होतं. आजोबरोबर काढलेल्या सुखद दिवसांची आठवण काढत एकमेकांना बिलगून हॅना आणि जॉर्ज खूप रडले.

एकीकडे तेरेत्सिनमध्ये माणसं येत होती, तर दुसरीकडे हजारो माणसं तिथून बाहेरही पडत होती. चौकोनी डब्यासारख्या बंद आगगाड्यांमध्ये भरून त्यांना पूर्वेकडे कुठेतरी पाठवलं जात होतं. त्याबद्दल थेरेजिअनश्टाट्च्या भिंतीआड अफवा पसरत होत्या. ही जाणारी माणसं तिकडे कदाचित चांगलं आयुष्य जगत असतील, अशी स्वतःची आणि इतरांचीही समजूत काही जण घालत होते. पण दिवस जाऊ लागले, तशा मृत्युछावण्यांच्या, तिथल्या क्रौर्याच्या आणि सामूहिक हत्यांच्या कथा वेगानं पसरायला लागल्या. कुणी या विषयावर बोलायला लागलं की हॅना आपले कान बंद करून घेत असे.

दर काही आठवड्यांनी कैद्यांच्या नावांची एक यादी प्रत्येक इमारतीच्या भिंतीवर लागत असे. ज्यांची नावं तिच्यात असत, त्यांना दोन दिवसांच्या आत रेल्वे स्टेशनजवळच्या हॉलमध्ये हजेरी लावावी लागे.

याद्या. सगळीकडे याद्या होत्या. नाझी सगळ्या गोष्टींच्या व्यवस्थित नोंदी ठेवत आणि त्याबद्दल सगळ्या कैद्यांना कळेल याची खबरदारीही घेत. ते माणसांची सतत मोजणी करत, नावांच्या याद्या करत आणि 'इथे सत्ता आमच्या हातात आहे' अशी कैद्यांना सारखी आठवण करून देत. असं सैनिकांचं आपल्याकडे लक्ष असणं, आपली मोजणी होणं याचाच अर्थ पुन्हा इथून दुसरीकडे हलवलं जाणं आणि घरच्यांपासून आणि मित्रांपासून ताटातूट होणं, हे तिथल्या प्रत्येकाला माहीत होतं.



एक दिवस हॅना आपली नेहमीची कामं करत होती. एवढ्यात छावणीतल्या लहानांपासून म्हाताऱ्यांपर्यंत प्रत्येकानं हातातलं काम थांबवून गावाबाहेरच्या मोठ्या मैदानावर जावं, असा हुकूम झाला. मशीनगन घेतलेल्या नाझी सैनिकांनी सर्वांना तिकडे चालवत नेलं. पोटात अन्न नाही, प्यायला पाणी नाही आणि काहीतरी भयंकर घडणार आहे अशी मनात भीती, अशा अवस्थेत सर्वांना तिथे उभं करण्यात आलं. हॅना आणि इतर मुलींना एकमेकींशी कुजबुजण्याचीही हिंमत झाली नाही.

जसा जॉर्जपासून दूर जावं लागण्याचा विचारही हॅनाला सहन होत नव्हता, तसाच किंडरहाइम एल४१०मधल्या मैत्रिणींपासून दूर होण्याचा विचार असह्य वाटत होता. त्या आता तिच्या बहिणीच झाल्या होत्या. आई-वडिलांना दूर केलं होतं तेवढं नाझींना पुरेसं नव्हतं का? एला तिच्या बाजूलाच उभी होती आणि हसून, डोळे मिचकावून तिला धीर देण्याचा प्रयत्न करत होती. पण अशा प्रकारे चार तास उभी राहिल्यानंतर मात्र हॅनाचा धीर सुटला आणि ती रडायला लागली.

आपल्या कोटात लपवून ठेवलेला पावाचा एक छोटा तुकडा एलानं हॅनाकडे सरकवला. "खा, हॅना," ती हळूच म्हणाली. "तुला बरं वाटेल." पण हॅनाच्या डोळ्यांतून पाणी वाहतच होतं. मग एला तिच्याकडे वळून कुजबुजली, "नीट ऐक माझं. तू घाबरलेली आहेस आणि तुला वाईट वाटतंय. आपलं सगळ्यांचं असं व्हावं, हेच तर त्या नाझींना हवं आहे. तो आनंद तू त्यांना देऊ नकोस, हॅना. त्यांना जे हवंय, ते तू त्यांना देऊ नकोस. आपण शक्तिमान आहोत. डोळे पुसून टाक, हॅना आणि चेहरा धीट कर." आणि आश्चर्य म्हणजे, हॅनानं तसंच केलं.

नाझी कमांडरनं एकेका कैद्याचं नाव पुकारायला सुरुवात केली. सगळ्यांचा हिशेब लागणं महत्त्वाचं होतं. अखेर, बोचऱ्या थंड वाऱ्यात आठ तास उभं राहिल्यानंतर सर्वांना आपापल्या बराकीत परत जाण्याचा हुकूम झाला.

तो १९४४ सालचा सप्टेंबर महिना होता. आपण युद्ध हरण्याच्या मार्गावर आहोत हे जसं नाझींच्या लक्षात आलं, तशी थेरेजिअनश्टाट्‌मधून बाहेर जाणाऱ्या कैद्यांची संख्या वाढवण्यात येणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. आगगाड्यांच्या फेऱ्या वाढल्या. आता भिंतीवर नावांची यादी रोजच लागायला लागली.

रोज सकाळी धडधडत्या काळजानं हॅना यादी पाहण्यासाठी मुख्य दरवाजाकडे धाव घेई. आणि जे नाव कधीतरी तिथे दिसणार अशी भीती तिला वाटत होती, ते एक दिवस तिला दिसलं - जॉर्ज ब्रॅडी. हॅनाच्या पायांमधलं त्राणच गेलं. ती मटकन खाली बसली आणि रडायला लागली. तिचं रक्षण करणाऱ्या तिच्या लाडक्या भावाला ते तिकडे पूर्वेकडे पाठवत होते. सडपातळ शरीराचा आणि काटक प्रकृतीचा जॉर्ज आता तरुण झाला होता आणि इतर २००० धडधाकट पुरुषांबरोबर त्याला स्टेशनावर हजर होण्याचा हुकूम झाला होता.

मुलांच्या आणि मुलींच्या किंडरहाइमच्या दरम्यान एक कच्चा रस्ता होता. जॉर्ज हॅनाला तिथे शेवटचं भेटला तेव्हा म्हणाला, ''मी उद्या निघणार आहे. आता तुला जेवढं म्हणून खाता येईल तेवढं खात जा. जेव्हा संधी मिळेल तेव्हा ताज्या, मोकळ्या हवेत जात जा. तब्येतीची काळजी घे. तब्येत चांगली राहिली पाहिजे. हे माझं आजचं रेशन. सगळं खाऊन टाक.''

जॉर्जनं हॅनाला घट्ट मिठी मारली. तिच्या डोळ्यांवर आलेले केस हलकेच मागे सारले. ''तुझी काळजी घेईन असं मी आई-बाबांना वचन दिलंय. मी तुला घरी सुखरूप परत नेईन. आपण सगळे पुन्हा भेटू, पूर्वीसारखे एकत्र राहू. मला माझं वचन मोडायचं नाहीये.'' तेवढ्यात संचारबंदीची शिटी कर्कशपणे वाजली आणि जॉर्ज परत गेला.



हॅनाचा सारा धीर गळून पडला. भावापासून ताटातूट तिला सहन झाली नाही. आधी आई-वडील, आणि आता भाऊ. तिला कमालीचं एकटेपण जाणवायला लागलं. बाकीच्या मुली जेव्हा तिचं मन रमवण्याचा प्रयत्न करत, तेव्हा ती मान फिरवे. कधी फटकन म्हणे, ''मला एकटं का राहू देत नाही तुम्ही?''

जे काही थोडं अन्न मिळे, ते खाण्यासाठी हॅनाचं मन वळवणं गोड स्वभावाच्या एलालाच तेवढं जमत असे. ''तुला तुझ्या भावानं जे सांगितलंय, ते लक्षात ठेव. निदान त्याच्यासाठी तरी तुला स्वतःच्या तब्येतीची काळजी घ्यायला हवी,'' एला म्हणे.

चार आठवड्यांनंतर हॅनाला कळलं की, तीसुद्धा पूर्वेकडे जाणार होती. आता जॉर्जची भेट होणार! ''मला जॉर्ज पुन्हा भेटेल,'' ती सगळ्यांना सांगत सुटली. ''तो माझी वाट बघतोय.''

लगेच हॅनानं एलाला शोधून काढलं. ''मला मदत करशील का?'' तिनं विचारलं. ''माझा भाऊ भेटेल तेव्हा मला छान दिसायचंय. मी स्वतःची किती नीट काळजी घेतली ते त्याला दाखवून द्यायचंय.'' एलाला स्वतःलाच भीती वाटत होती, पण आपल्या छोट्या मैत्रिणीला वाटणारी आशा तिला कोमेजू द्यायची नव्हती. ती हॅनाकडे बघून हसली आणि कामाला लागली. तिनं पंपाचं पाणी आणलं; जवळ शिल्लक असलेल्या साबणाच्या बारक्या तुकड्यानं तिनं हॅनाचा चेहरा धुतला; जटा झालेले, घाण झालेले केस धुतले. मग ते पोनीटेल करून चिंधीच्या तुकड्यानं बांधले. गाल थोडे लाल दिसावेत म्हणून हॅनाचे गालगुच्चे घेतले. मागे सरकून एलानं आपली कामगिरी कशी झाली आहे हे पाहिलं. हॅनाचा चेहरा आशेनं उजळला होता. ''थँक्यू, एला!'' आपल्या मोठ्या मैत्रिणीला मिठी मारून ती म्हणाली. ''तू नसतीस तर मी काय केलं असतं, कोण जाणे!'' जॉर्ज गेल्यापासून पहिल्यांदाच ती आनंदात दिसत होती.

त्या रात्री हॅनानं आपली सूटकेस भरली. भरण्यासाठी फार काही नव्हतंच. खूप विरलेले थोडेफार कपडे, फ्रिड्‌ल्‌च्या वर्गात केलेलं एक आवडतं चित्र आणि एलानं दिलेलं एक गोष्टीचं पुस्तक. आवरून झाल्यावर हॅना आपल्या अंथरुणात शिरली

आणि थेरेजिअनश्टाट्मधल्या शेवटच्या रात्री झोपून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी हॅनाला आणि किंडरहाइम एल४१० मधल्या इतर अनेक मुलींना रेल्वेपर्यंत चालवत नेलं गेलं. नाझी पहारेकरी हुकूम सोडत होते आणि त्यांचे कुत्रे दात विचकत गुरगुरत होते. कोणतीही मुलगी रांग सोडून बाहेर गेली नाही.

''आपण कुठे निघालो आहोत?'' हॅनानं कुजबुजत एलाला विचारलं. कोणालाच ते माहीत नव्हतं. अंधाऱ्या डब्यांमध्ये मुली एक एक करत चढल्या. अखेर आगगाडीत एक इंचही मोकळी जागा उरली नाही. आतली हवा कोंदट झाली आणि गाडीची चाकं फिरायला लागली.

एक संपूर्ण दिवस आणि रात्र गाडी धडाडत धावत होती. आत अन्न-पाणी, स्वच्छतागृह वगैरे काहीही नव्हतं. असा हा प्रवास किती वेळ चालणार आहे याचीही मुलींना कल्पना नव्हती. त्यांचे घसे कोरडे पडले होते, अंगातली हाडं दुखत होती, पोटातली आतडी भुकेमुळे आवळली होती.

गाणी म्हणून त्या मुली एकमेकींना धीर द्यायचा प्रयत्न करत होत्या. ''मला टेकून बैस आणि ऐक,'' एला हॅनाला म्हणाली.

त्यामुळे, मला जेव्हा रडूरडू होतं
तेव्हा मला तिची आठवण येते.
तिच्या पावलांवर पाऊल ठेवून
चालत असल्याची मी कल्पना करते
आणि मग, मला माझं आयुष्य
खूपच सुखाचं वाटायला लागतं.

मुलींनी एकमेकींचे हात धरले. डोळे मिटून घेऊन आपण दुसरीकडे कुठेतरी आहोत अशी कल्पना केली. प्रत्येकीची कल्पना वेगळी होती. हॅनानं डोळे मिटले तेव्हा तिच्या डोळ्यांसमोर भावाचा हसरा चेहरा आला.



आणि अचानक, २३ ऑक्टोबर १९४४च्या मध्यरात्री, कचकचून आवाज करत गाडीची चाकं फिरायची थांबली. डब्यांचे दरवाजे उघडले. मुलींना बाहेर येण्याचा हुकूम झाला. ते आउसश्वित्स होतं.

एका रागीट पहारेकऱ्यानं मुलींना प्लॅटफॉर्मवर सरळ रांगेत चुपचाप उभं राहण्याचा हुकूम केला. झेप घेण्यासाठी ओढ घेत असलेल्या भल्यामोठ्या कुत्र्याचा पट्टा त्यानं खेचून धरला होता. पहारेकऱ्यानं सगळ्या मुलींकडे डोक्यापासून पायापर्यंत झटकन बघून घेतलं. एक मुलगी जरा जास्तच उंच होती आणि तिला त्यामुळे नेहमी अवघडल्यासारखं वाटे. पहारेकऱ्यानं तिच्या दिशेनं चाबकाचा फटका ओढला. ''तू! तिकडे, उजवीकडे!'' तो खेकसला. मग आणखी एका मोठ्या मुलीच्या दिशेनं चाबूक फटकारत तो म्हणाला, ''तूसुद्धा, तिकडे!'' नंतर त्यानं प्लॅटफॉर्मच्या कडेला उभ्या असलेल्या तरुण सैनिकांच्या गटाला बोलावलं. हॅना आणि बाकीच्या मुलींकडे बोट करून तो त्यांना म्हणाला, ''घेऊन जा यांना!'' प्रचंड आकाराच्या फिरत्या दिव्यांच्या प्रखर उजेडानं मुलींचे डोळे दिपत होते. ''तुमच्या सूटकेस इथेच प्लॅटफॉर्मवर ठेवा!'' सैनिकांनी हुकूम सोडला.

भयंकर दिसणाऱ्या कुत्र्यांच्या आणि गणवेशातल्या सैनिकांच्या रोखलेल्या नजरांपुढून हॅना आणि तिच्या मैत्रिणी लोखंडी फाटकातून आत शिरल्या. हॅनानं एलाचा हात घट्ट धरून ठेवला होता. प्रचंड बराकींच्या समोरून जाताना चट्ट्यापट्ट्याचा गणवेश घातलेले, हाडांच्या सापळ्यांसारखे दिसणारे कैदी दारांआडून पाहत असलेले त्यांना दिसले. एका मोठ्या इमारतीमध्ये त्यांना नेण्यात आलं. उरात धडकी भरवणारा आवाज करून इमारतीचा दरवाजा बंद झाला.

# तेरेत्झिन

## जुलै २०००

''या खुणेचा अर्थ काय?'' हॅना ब्रॅडी आणि जॉर्ज ब्रॅडी यांची नावं असलेल्या यादीचं पान पाहत फ्युमिकोनं विचारलं.

लुडमिला जरा अडखळली आणि मग सावकाश म्हणाली, ''त्या खुणेचा अर्थ, त्या व्यक्तीची छावणीतून जिवंत सुटका झाली नाही.''

फ्युमिकोनं त्या पानाकडे पुन्हा नजर टाकली. हॅनाच्या नावापुढे खूण होती. थेरेजिअनश्टाट्मधून गेलेल्या जवळजवळ पंधरा हजार मुलांप्रमाणेच हॅनालाही आउसश्वित्समध्ये मृत्यू आला.

फ्युमिकोनं मान झुकवली आणि डोळे मिटून घेतले. त्या भयंकर गोष्टीचा अंदाज तिनं केला होताच, पण तरीही ते ऐकणं आणि समोरच्या कागदावर त्याची प्रत्यक्ष नोंद पाहणं, हा धक्काच होता. फ्युमिको काही मिनिटं शांत बसून राहिली.

मग स्वतःला सावरत तिनं वर पाहिलं. हॅनाची गोष्ट अजून संपलेली नव्हती. फ्युमिकोला आता तिच्याबद्दल सगळं काही समजून घेण्याची पूर्वीपेक्षाही जास्त इच्छा झाली. स्वतःसाठी, जपानमध्ये तिची वाट बघत असलेल्या मुलांसाठी आणि हॅनाच्या आठवणीसाठी. ह्या मुलीचं अशा प्रकारे अन्यायानं इतक्या लहान वयात संपवलं गेलेलं आयुष्य आठवणीतून पुसू द्यायचं नाही, असा निश्चयच तिनं केला. शोध संपलेला नव्हता.

''जॉर्जच्या नावापुढे खूण नाहीये,'' फ्युमिको म्हणाली. ''आपल्याला त्याच्याबद्दल काही कळू शकेल का? त्याचं पुढे काय झालं? तो कुठे गेला? तो अजून जिवंत आहे का?'' त्याचा पत्ता लागू शकला, तर हॅनाबद्दल आणखी माहिती कळण्यासाठी त्याची मदत होऊ शकेल, या विचारानं फ्युमिकोच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

फ्युमिकोकडे बघताना लुडमिलाला वाईट वाटत होतं. हॅनाची माहिती मिळवण्यासाठी फ्युमिको किती अधीर झाली होती, ते तिला दिसत होतं. ''जॉर्जचं काय झालं याची मला काहीच कल्पना नाही,'' ती हलकेच म्हणाली. ''युद्ध संपून आता खूपच वर्षं झाली आहेत ना! तो जगात कुठेही गेलेला असू शकेल. त्यानं कदाचित आपलं नावही बदललेलं असेल, किंवा युद्धानंतर इतक्या वर्षांनी तो कदाचित मरणही पावलेला असेल.''

''प्लीज! त्याचा शोध घेण्यासाठी तुम्ही मला मदत करायलाच हवी,'' फ्युमिकोनं विनवलं.

लुडमिलानं उसासा टाकला आणि नावांच्या याद्या असलेल्या पुठ्ठ्याच्या बांधणीच्या वह्या जिथे दाटीवाटीनं ठेवल्या होत्या, त्या शेल्फकडे ती पुन्हा वळली. ''यात कुठे काही पत्ता लागतो का ते पाहू या,'' ती म्हणाली. जॉर्ज ब्रॅडीचं नाव आणखी एखाद्या यादीमध्ये दिसतं का, ते दोघींनी मिळून तासभर शोधलं, आणि अखेर त्यांना ते सापडलं. थेरेजिअनश्टाट्मध्ये मुलांसाठी असलेल्या किंडरहाइम एल४१७ या इमारतीत ठेवलेल्या कैद्यांच्या यादीत त्याचं नाव होतं. त्यात सहा-सहा नावांचे गट होते, कारण तिमजली बंक बेडवरच्या एका गादीवर दोन मुलांना झोपावं लागत होतं. जॉर्ज ब्रॅडीचं नाव असलेली यादी पाहिल्यावर लुडमिलानं चमकून फ्युमिकोकडे पाहिलं.

''कुर्ट कोटाउच...कुर्ट कोटाउच...'' लुडमिला पुटपुटली. ''हे नाव मला माहिती आहे. हा गृहस्थ जिवंत आहे. मला वाटतं, जॉर्जचा हा बंकवरचा जोडीदार प्रागमध्ये राहत असावा. पण नेमकं कुठे ते मला माहीत नाही. तो जर सापडू शकला, तर हॅनाच्या भावाचं पुढे काय झालं ते कदाचित तुम्हांला सांगू शकेल. दुर्दैवानं मला मात्र आता तुमच्यासाठी याहून जास्त काही करता येणार नाही. प्रागमधल्या ज्यूंच्या संग्रहालयात चौकशी करा. तिथे कुणीतरी मदत करू शकेल.''

लुडमिलानं केलेल्या सगळ्या मदतीबद्दल फ्युमिकोनं तिचे पुन्हापुन्हा आभार मानले, तिला आलिंगन दिलं आणि पुढे जे जे होईल त्याबद्दल कळवत राहीन, असं आश्वासन दिलं. लुडमिलानंही फ्युमिकोला शुभेच्छा दिल्या. मग फ्युमिकोनं आपली ब्रीफकेस उचलली आणि गावातल्या चौकाकडे धाव घेतली. प्रागला जाणारी बस कुठल्याही क्षणी येऊ शकत होती.



## प्राग

## जुलै २०००

फ्युमिकोच्या हातात आता दिवसाचे अगदी थोडे तास उरले होते. कारण तिचं जपानचं विमान दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर सुटणार होतं. बसमधून प्रागमध्ये उतरल्याक्षणीच तिनं टॅक्सी थांबवली. ''ज्यू संग्रहालय, प्लीज!'' ती धापा टाकत म्हणाली.

ती पोचली तेव्हा संग्रहालय बंद व्हायला अगदी थोडाच वेळ उरला होता. रखवालदारानं तिला दुसऱ्या दिवशी यायला सांगितलं. ''पण ते शक्य नाही! उद्या सकाळी मला जपानला परत जायचं आहे. मला मिशाएला हायेकना भेटायचं आहे. काही महत्त्वाची रेखाटनं शोधायला त्यांनी मला मदत केली होती.'' रखवालदाराची कशानंच समजूत पटत नाही असं दिसल्यावर तिनं लहानशी थाप मारायचं ठरवलं आणि ठोकून दिलं, ''त्या माझी वाट पाहताहेत.'' तिला आत प्रवेश मिळाला.

या वेळी मात्र नशिबानं फ्युमिकोची साथ सोडली नाही. हायेकबाई ऑफिसात होत्या आणि त्यांना हॅनाची कहाणी आठवतही होती. फ्युमिको आपल्याला सापडलेल्या सगळ्या धाग्यादोऱ्यांबद्दल सांगत असताना त्या लक्ष देऊन ऐकत होत्या.

''कुर्ट कोटाउचबद्दल मी ऐकलेलं आहे,'' त्या शांत सुरात म्हणाल्या. फ्युमिकोला खरंच वाटेना. ''त्यांना शोधण्यासाठी मी तुम्हांला मदत करीन,'' बाईंनी

वचन दिलं. फ्युमिकोकडे अजिबात वेळ नव्हता, हे त्यांच्या लक्षात आलं.

मिशाएला हायेक एकामागून एक फोन करत होत्या आणि फ्युमिको शांतपणे बसून होती. त्या जिला फोन करत ती व्यक्ती दुसऱ्या कोणाचातरी नंबर देई. अखेर, ज्या कार्यालयात कोटाउचसाहेब कलेचे इतिहासकार म्हणून काम करत होते, तिथे फोन लागला. पलीकडून त्या कार्यालयाची सेक्रेटरी बोलत होती. बाईंनी फोन फ्युमिकोच्या हातात दिला आणि ती आपल्याला काय हवं आहे ते सांगायला लागली. त्या सेक्रेटरीची तिला मदत करण्याची तयारी होती, पण थोड्याच वेळात कोटाउचसाहेब कुठे परदेशी जायला निघणार होते. ''सॉरी,'' ती म्हणाली, ''त्यांची भेट होणं अशक्य आहे.'' त्यांना फोनवर बोलण्यासाठीही वेळ मिळणं शक्य नव्हतं.

फ्युमिकोचा पडलेला चेहरा मिशाएला हायेकबाई पाहत होत्या. त्यांनी फोन पुन्हा स्वतःकडे घेतला आणि सेक्रेटरीला विनंती केली. ''ही तरुण मुलगी किती हताश झालेली आहे याची तुम्हांला कल्पना नाही. उद्या सकाळी तिला जपानला परत जायचंय. ही तिची शेवटची संधी आहे.'' अखेर सेक्रेटरीनं कोटाउच यांना निरोप देण्याचं मान्य केलं.

दोन तास उलटले. बाहेर अंधार पडला होता आणि संग्रहालय तर बंदच झालं होतं. फक्त एका ऑफिसमधला दिवा जळत होता. फ्युमिको आणि मिशाएला हायेक तिथे बसून कोटाउचसाहेबांची वाट पाहत होत्या.

अखेर कोटाउच आले. दणकट शरीरप्रकृतीच्या आणि चमकणाऱ्या डोळ्यांच्या त्या गृहस्थांकडे सांगण्यासारखं बरंच काही होतं. ''मी विमानतळावर निघालोय आणि माझ्याकडे फक्त अर्धा तास आहे. जॉर्ज ब्रॅडी मला आठवतोय तर! थेरेजिअनश्टाट्मध्ये आम्ही एकाच पलंगावर झोपायचो. थेरेजिअनश्टाट्सारख्या ठिकाणी झालेल्या ओळखी सहजासहजी विसरता येत नाहीत. इतकंच नाही, तर आमची मैत्री आजही कायम आहे. जॉर्ज कॅनडामध्ये, टोरांटोला राहतो.''



कोटाउचसाहेबांनी चामडी बांधणीची एक छोटी वही बाहेर काढली. त्यांनी ब्रॅडीचा पत्ता लिहून फ्युमिकोला दिला आणि ते हसून म्हणाले, ''तुम्ही हेच शोधताहात; हो नं?''

''मिस्टर कोटाउच, मी तुमचे आभार कसे मानू?'' फ्युमिको म्हणाली.

''गुडलक! हॉलोकॉस्टच्या धड्यापासून काही शिकण्याची जपानी मुलांची इच्छा आहे, हे पाहून फार बरं वाटलं,'' कोटाउच म्हणाले आणि आपलं सामान उचलून त्यांनी ऑफिसमधून जवळजवळ उड्डाणच केलं.

फ्युमिकोचा चेहरा आनंदानं फुलून आला. तिनं दाखवलेल्या चिकाटीला फळ आलं होतं. तिनं हायेकबाईंचेही मनापासून आभार मानले.

दुसऱ्या दिवशी सकाळी फ्युमिको जपानच्या लांबच्या प्रवासाला निघाली. तिचं मन अजूनही उत्तेजितच होतं आणि तिला आतून गुदगुल्या होत होत्या. सेंटरला गेल्यानंतर मुलांना सांगण्यासाठी ती सगळ्या घडामोडींची मनातल्यामनात उजळणी करत होती. मग हॅनाच्या भावाचा विचार तिच्या मनात आला. आपली स्वतःची तीन वर्षांनी धाकटी असलेली बहीण तिच्या डोळ्यांसमोर आली. फ्युमिको नेहमीच तिची काळजी घेई. तिच्यावर उद्या काही संकट ओढवलं तर आपण काय करू, याची कल्पना ती करायला लागली. त्या विचारानंही तिच्या अंगावर शहारा आला. खिडकीतून बघत हॅनाची कहाणी आपल्या मनामध्ये पुन्हापुन्हा घोळवता घोळवता तासाभरानंतर फ्युमिकोला गाढ झोप लागली. गेल्या अनेक दिवसांत तिला अशी झोप घेता आली नव्हती.

# टोकियो

## ऑगस्ट २०००


टोकियोला आल्यानंतर फ्युमिकोनं 'स्मॉल विंग्ज'ची खास बैठक बोलावली. आपल्या युरोप भेटीचा अगदी बारीकसारीक तपशिलांसह सगळा वृत्तान्त तिनं मुलांना सांगितला. सर्वांत प्रथम तिनं ती दुःखद बातमी सांगितली. भोवती वर्तुळ करून बसलेल्या मुलांना तिनं शांत आवाजात सांगितलं की, हॅना आउसश्वित्समध्ये मरण पावली. तशी मुलांनी याची कल्पना आधीपासून केली होतीच.

''पण, माझ्याकडे तुमच्यासाठी एक झकास बातमीही आहे,'' फ्युमिको म्हणाली. मुलांचे चेहरे उजळले. ''हॅनाला एक भाऊ होता, आणि तो त्या छळछावणीतून वाचला.''

हे ऐकल्यावर प्रश्नांचा पाऊस पडायला लागला. ''तो कुठे आहे?'' मायकोनं विचारलं. ''त्याचं वय काय आहे?'' दुसऱ्या मुलानं प्रश्न केला. ''हॅनाची सूटकेस आपल्याकडे आहे, हे त्याला माहीत आहे का?'' अकिरानं चौकशी केली. फ्युमिकोनं आपल्याला जे जे माहिती होतं ते सगळं सांगितलं आणि आजच रात्री मी जॉर्जला पत्र लिहीन, असं आश्वासन दिलं.

''पत्राबरोबर आणखीही काहीतरी पाठवू या का?'' माइकोनं विचारलं. लगेच मोठी मुलं सेंटरच्या वेगवेगळ्या कोपऱ्यांमध्ये बसून कविता लिहायला लागली. ''मी






टोकियो हॉलोकॉस्ट सेंटरमधील लहान मुलांनी हॅनाला वाहिलेली चित्रांजली.

काय करू?'' अकिरानं माइकोला विचारलं.

''हॅनाचं चित्र काढ.''

''पण ती कशी दिसत होती हे मला कुठे माहीत आहे?'' तो म्हणाला.

''तिची कल्पना करून चित्र काढ,'' माइको म्हणाली. मग अकिरानं कल्पनेनं चित्र काढलं.

फ्युमिकोनं जॉर्जला पाठवण्याचं पत्र अतिशय काळजीपूर्वक लिहिलं. ते पाहून जॉर्जला धक्का बसेल याची तिला कल्पना होती. हॉलोकॉस्टमधून वाचलेल्या काही

लोकांनी तर नंतर त्या सगळ्या अनुभवांबद्दल, आठवणींबद्दल बोलण्याचंही साफ टाळलेलं होतं, हेही तिला माहिती होतं. जॉर्जच्या आठवणी इतक्या कटू आणि दुःख देणाऱ्या असतील की, त्यालाही हॅना आणि तिच्या सूटकेसबद्दल आणि जपानमधल्या हॉलोकॉस्ट सेंटरबद्दल काही ऐकण्याची इच्छाच नसेल, अशी भीती तिला वाटत होती.

फ्युमिकोनं हॅनाच्या चित्रांचे फोटो काढले. मुलांनी काढलेली चित्रं आणि लिहिलेल्या कविता त्या फोटोंबरोबर एका पाकिटात नीट घातल्या. मग ते पार्सल घेऊन ती पोस्टात गेली आणि तिनं ते कॅनडाला पाठवून दिलं.



# टोरांटो, कॅनडा

## ऑगस्ट २०००

ऑगस्ट महिन्यातली ती स्वच्छ उन्हाची दुपार होती. बहात्तर वर्षांचे जॉर्ज ब्रॅडी त्या दिवशी कामावरून लवकर घरी परत आले होते. काही किरकोळ कामं उरकून उरलेली दुपार आपल्या रिकाम्या घरातच निवांतपणे घालवण्याचा त्यांचा बेत होता. ते जेवणाच्या टेबलाशी बसलेले असताना त्यांना पोस्टमनच्या पावलांचा, मग दरवाजातल्या फटीतून टपाल आत सरकवल्याचा आणि ते धपकन जमिनीवर पडल्याचा आवाज ऐकू आला. थोड्या वेळानं उठून ते बघावं, असा विचार करत असतानाच दरवाजाची घंटी वाजली.

जॉर्जनी दरवाजा उघडला, तर समोर पोस्टमन उभा होता. ''हे फटीतून आत जात नाहीये,'' असं म्हणून एक जाड पाकीट त्यानं जॉर्जच्या हातात दिलं. त्यावर जपानच्या पोस्टाचा शिक्का होता. जॉर्जना प्रश्न पडला, हे काय असेल? त्यांच्या ओळखीचं तर कोणीच जपानमध्ये राहत नव्हतं.

जॉर्जनी पार्सल उघडलं. आतलं पत्र वाचताना त्यांच्या छातीत धडधडलं. त्यांनी डोळे मिटून घेतले. मग पुन्हा उघडून ते चोळले आणि वाचत असलेला मजकूर खराच असल्याची खात्री करून घेतली. आपण जागेपणी स्वप्न तर पाहत नाही आहोत ना, असं त्यांना वाटू लागलं.


आपल्या बहिणीला गमावणं हे जॉर्ज ब्रॅडींचं खोलवरचं दुःख होतं. पन्नासहून जास्त वर्षांपासून ते ही जखम काळजात घेऊन जगत होते आणि आपण आपल्या बहिणीचं रक्षण करायला हवं होतं, या विचारानं त्यांची पाठ सोडली नव्हती.

आणि आता, जगाच्या दुसऱ्या टोकाला कुणीतरी तिची गोष्ट पुन्हा सांगत होतं आणि तिच्या छोट्याशा आयुष्याचा सन्मान होत होता. जॉर्ज ब्रॅडी आश्चर्यानं थक्क झाले. ते खाली बसले. त्यांचं मन पंचावन्न वर्षं मागे गेलं.

जानेवारी १९४५मध्ये आउसश्वित्समधल्या कैद्यांची मुक्तता झाली तेव्हा जॉर्ज सतरा वर्षांचा होता. त्या भयानक मृत्युछावणीतून तो सुदैवानं सहीसलामत बाहेर आला होता आणि थेरेजिअनश्टाट्मध्ये शिकून घेतलेल्या प्लंबिंगच्या कामाचा त्याला त्यासाठी उपयोग झाला होता. छावणीतून तो बाहेर पडला तेव्हा अतिशय अशक्त आणि बारीक झालेला होता. पण नोव्हे मेस्टोला आपल्या आई-वडिलांकडे आणि बहिणीकडे जाण्याचा त्यानं निश्चय केला होता. सगळ्या कुटुंबानं एकत्रच राहायचं अशी त्याची इच्छा होती. कधी चालत, कधी आगगाडीनं, तर कधी कुणाकडे लिफ्ट मागत १९४५च्या मेमध्ये तो आपल्या लाडक्या नोव्हे मेस्टोला पोचला आणि थेट लुडविककाका आणि हेड्डाआत्या यांच्या घरी गेला. त्याला प्रेम, माया आणि आसरा मिळालेलं हे शेवटचं ठिकाण होतं. दरवाजात उभ्या असलेल्या आपल्या भाच्याला पाहताच आत्यानं आणि काकानं रडतरडत त्याला मिठीत घेतलं, कुरवाळलं, त्याचे पापे घेतले. जॉर्ज जिवंत आहे, या गोष्टीवर त्यांचा विश्वासच बसेना.

पण हा पुनर्भेटीचा आनंद थोडाच वेळ टिकला. ''आई-बाबा कुठे आहेत?'' जॉर्जनं विचारलं. लुडविककाका आणि हेड्डाआत्याला खरं ते सांगावंच लागलं. मार्केताला, जॉर्जच्या आईला राव्हन्सब्रुकहून आउसश्वित्सला पाठवून १९४२मध्ये मारून टाकण्यात आलं होतं, आणि नंतर लवकरच त्याच्या वडिलांना, म्हणजे कॅरल यांनाही ठार करण्यात आलं होतं. ''आणि हॅना?'' जॉर्जनं कसंबसं विचारलं. तिलाही आउसश्वित्सला नेलं होतं एवढंच आत्या आणि काकाला माहीत होतं.





जॉर्ज ब्रॅडी यांचे अलीकडील छायाचित्र.

काहीतरी करून हॅना परत येईल, या आशेवर जॉर्जनं पुढचे काही महिने काढले. रस्त्यात दिसणाऱ्या प्रत्येक मुलीच्या चेहऱ्यात, तिच्या वाऱ्यावर उडणाऱ्या पोनीटेलमध्ये, रस्त्यातून उड्या मारत धावणाऱ्या मुलीच्या प्रत्येक पावलामध्ये तो हॅनाला शोधत होता. एके दिवशी प्राग शहरातल्या मुख्य रस्त्यावर त्याला एक मुलगी भेटली. तीच त्याच्यासमोर येऊन उभी राहिली.

''जॉर्ज?'' तिनं विचारलं. ''तू जॉर्ज ब्रॅडी, हॅनाचा भाऊ आहेस, हो ना? माझं नाव मार्ता. हॅनाशी माझी ओळख होती. थेरेजिअनश्टाट्मधल्या आम्हां सगळ्या मोठ्या मुलींची ती लाडकी होती.'' जॉर्जनं आणखी माहिती मिळण्याच्या आशेनं मार्ताच्या डोळ्यांमध्ये पाहिलं. त्याला आपल्या बहिणीच्या शेवटाबद्दलची खरी गोष्ट माहिती नाही, हे मार्ताच्या लक्षात आलं. तिनं जॉर्जचा हात हातात घेतला आणि शांत स्वरात त्याला सांगितलं, ''जॉर्ज, हॅनाला त्यांनी ज्या दिवशी आउसश्वित्सला नेलं, त्याच दिवशी तिला गॅस चेंबरमध्ये पाठवलं. सॉरी, जॉर्ज...'' जॉर्जच्या पायांतली शक्तीच जणू नाहीशी झाली आणि सगळीकडून अंधारून आल्यासारखं झालं.

ホロコースト教育資料センター
Tokyo Holocaust Education Resource Center
~For Children, Builders of Peace

〒160-0015 東京都新宿区大京町28-106
TEL:03-5363-4808 FAX:03-5363-4809
28-106 Daikyo-cho Shinjuku-ku Tokyo 160-0015 JAPAN
TEL:+81-3-5363-4808 FAX:+81-3-5363-4809
E-mail: Holocaust@tokyo.email.ne.jp
Website: http://www.ne.jp/asahi/holocaust/tokyo

Mr. George Brady
23 Blyth Hill Road
Toronto 12, M4N 3L5
CANADA

August 22, 2000

Dear Mr. Brady,

We take a liberty of addressing and telling you about our activities in Japan. My name is Fumiko Ishioka and I am Director of Tokyo Holocaust Education Resource Center. In July this year I met with Mr. Kurt Jiri Kotouc in Prague and I got your address from him. The reason why I am writing to you is because we are now exhibiting your sister, Hanna Brady's suitcase at our Center. Please forgive me if my letter hurts you reminding you of your past difficult experiences. But I would very much appreciate it if you could kindly spare some time to read this letter.

Please let me start with a little explanation on what we do in Japan. Tokyo Holocaust Education Resource Center, established in October 1998, is a non-profit, educational organization that aims at further promoting understanding of the history of the Holocaust especially among young children in this country. Children here do not have a chance to learn about the Holocaust, but we believe it is our responsibility too to let our next generation learn the lessons of the Holocaust so that such a tragedy would never be repeated again anywhere in the world. As well as learning the truth of the Holocaust, it is also very important for children, we believe, to think about what they can do to fight against racism and intolerance and to create peace by their own hands.

Besides welcoming children at our Center for exhibition and study programs, this year we organized a pair of traveling exhibition, "The Holocaust Seen Through Children's Eyes" in order to reach more children living far from our Center. For this project, we borrowed some children's memorial items from individuals and museums in Europe, one of which is Hanna Brady's suitcase from the museum of Auschwitz. Many children are now visiting our Center to see this suitcase to learn about the Holocaust. In June, furthermore, we held the Children's Forum on the Holocaust 2000, where our Center's children's group "Small Wings" did a little opening performance on Hanna's suitcase. "Small Wings" is a group of children, aged from 8 to 18, who write newsletters and make videos to let their friends know about the Holocaust and share what they learn from it. At the Forum they decided to use Hanna's suitcase to do an introduction for their friends who have never heard of the Holocaust. It successfully helped participants of the Forum focus on one little life, among one and a half million, lost during the Holocaust, and think about importance of remembering this history.

When I received the suitcase from the museum of Auschwitz, all the information I had were things written on the suitcase, her name and her birthday, and from the Terezin memorial book I got the date when she was deported to Auschwitz. I could also find 4 of her drawings from Terezin. But that was all. Hoping to get more information on Hanna, I went to Terezin in July, when I found your name on the list I got from the ghetto museum and heard that you survived. I was then so lucky to find Mr Kotouc in Prague and met with him, from whom I heard you now live in Toronto. Those children of "Small Wings" were all so excited to know Hanna had a brother and he survived.

I was wondering if you would kindly be able to tell us about you and Hanna's story, the time you spent with Hanna before sent to the camp, things that you talked with her, you and her dreams, and anything that would help children here feel close to you and Hanna to understand what prejudice, intolerance and hatred did to young Jewish children. If possible, I would be grateful if you could lent us any kind of memorial items such as your family's photo, and so on. It will greatly help us further promote our goal to give every child in Japan a chance to learn about the Holocaust.

Thank you very much for your time. I would very much appreciate your kind understanding for our activities.

I look forward to hearing from you.

With kindest regards,

Fumiko Ishioka
Director
Tokyo Holocaust Education Resource Center

फ्युमिकोनं जॉर्जना पाठवलेलं पत्र.



# टोरांटो

## ऑगस्ट २०००

जॉर्जला आपल्या आई-वडिलांच्या आणि बहिणीच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल कळल्यानंतरच्या पन्नासएक वर्षांमध्ये कितीतरी गोष्टी घडून गेल्या. वयाच्या सतराव्या वर्षीच जॉर्जनं नोव्हे मेस्टो सोडलं आणि तो युरोपात या शहरातून त्या शहरात असा भटकत राहिला. लुडविककाका आणि हेड्डाआत्यानं कुटुंबाचे फोटो असलेला खोका त्याच्यासाठी सांभाळून ठेवला होता. आता जॉर्ज तो नेहमीच जवळ बाळगत होता. १९५१मध्ये तो टोरांटोला गेला, आणि त्याच्याप्रमाणेच हॉलोकॉस्टमधून वाचलेल्या एका मित्राबरोबर त्यानं प्लंबिंगचा व्यवसाय सुरू केला. तो खूप चांगला चालला. पुढे जॉर्जनं लग्न केलं. त्याला तीन मुलगे आणि बऱ्याच उशिरा एक मुलगी झाली.

हॉलोकॉस्टमध्ये खूप त्रास सोसावा लागलेला असूनही, आई-वडील आणि बहिणीचा नाझींनी निर्दयपणे खून केलेला असूनही, डगमगून न जाता जॉर्ज ब्रॅडी आपलं आयुष्य चांगल्या प्रकारे जगत राहिले. त्यांना या गोष्टीचा अभिमान होता. त्यांचा व्यवसाय चांगला चालला. आपल्या मुलांचा त्यांना अभिमान होता. युद्धाच्या काळातले कटू अनुभव मागे टाकून आपलं पुढलं आयुष्य आनंदात जगण्याची ताकद त्यांच्यापाशी होती. पण असं असूनही, आपल्या लाडक्या बहिणीच्या वाट्याला जे दुर्दैव आलं, त्याबद्दलच्या दुःखाची किनार या सगळ्याला होतीच.

आणि आता, जगाच्या दुसऱ्या टोकाकडून हे पत्र आलं होतं. हॉलोकॉस्टबद्दल समजून घेण्यासाठी त्यांच्या बहिणीच्या सूटकेसची जपानमधल्या पुढील पिढीला मदत होते आहे, हे सांगणारं ते पत्र होतं. त्यात फ्युमिकोनं अतिशय हळुवारपणे जॉर्ज ब्रॅडींकडे मदत मागितली होती.

या पत्रामुळे तुमच्या आयुष्यातल्या काही नकोशा गोष्टींची आठवण होऊन तुम्हांला त्रास होणार असेल, तर मला क्षमा करा. पण तुम्ही आम्हांला तुमची आणि हॅनाची गोष्ट सांगितलीत, तर आम्हांला खूप आनंद होईल. तुम्हांला छावणीत पाठवलं, त्यापूर्वी तुम्ही हॅनाबरोबरचे दिवस कसे घालवलेत, तिच्याशी कशाबद्दल बोललात, कोणती स्वप्नं पाहिलीत, हे समजून घेण्याची आमची इच्छा आहे. इथे जपानमधल्या मुलांना तुमच्या आणि हॅनाच्या आणखी जवळ जाता येईल, अशी कोणतीही गोष्ट ऐकायला आम्हांला आवडेल. गैरसमज, पूर्वग्रह, असहिष्णुता आणि तिरस्कार या भावनांमुळे लहान ज्यू मुलांना काय काय सहन करावं लागलं, ते आम्हांला समजून घ्यायचं आहे.

तुम्ही तुमच्या कुटुंबाचे काही फोटो पाठवू शकलात तर मी फार आभारी होईन. हॉलोकॉस्टमधून वाचलेल्या अनेकांची कुटुंबं आणि त्याचबरोबर त्यांचे फोटोही नाहीसे झाले, याची मला कल्पना आहे. पण जर तुमच्याकडे काही फोटो असतील, तर जपानमधल्या मुलांना हॉलोकॉस्टबद्दल समजून घेण्यासाठी त्यांची खूप मदत होऊ शकेल. हॅनाला एक भाऊ होता आणि तो हॉलोकॉस्टमधून वाचला आहे, हे कळल्यावर 'टोकियो हॉलोकॉस्ट सेंटर'मधल्या आम्हां सगळ्यांना आणि 'स्मॉल विंग्ज क्लब'च्या मुलांना खूप आनंद झाला आहे.

खाली सही होती - फ्युमिको इशिओका.



जॉर्ज ब्रॅडींचा विश्वासच बसेना. केवढ्या विलक्षण योगायोगांनी तीन जगं एकत्र आणली होती! जपानमधल्या मुलांचं जग, कॅनडातल्या जॉर्ज ब्रॅडींचं जग आणि कित्येक वर्षांपूर्वी मरण पावलेल्या एका ज्यू मुलीचं चेकोस्लोव्हाकियामधलं जग. गालांवरून ओघळणारे अश्रू पुसून जॉर्ज स्वतःशीच हसले. छोट्या हॅनाचा चेहरा त्यांना स्पष्ट दिसायला लागला. तिचं हसू ऐकू आलं आणि तिच्या मऊ हाताचा स्पर्श त्यांच्या हाताला जाणवला. आपल्या लाकडी ड्रॉवरच्या कपाटाकडे जाऊन त्यांनी एक फोटोंचा आल्बम बाहेर काढला. फ्युमिको इशिओकाला लवकरात लवकर उत्तर पाठवायला हवं होतं.

## टोकियो

## सप्टेंबर २०००

टोरांटोला पत्र पाठवल्यापासून फ्युमिको बेचैन होती. जॉर्ज ब्रॅडी उत्तर पाठवतील का, हॅनाबद्दलची माहिती मिळवायला मदत करतील का, याबद्दल तिला उत्सुकता होती. फ्युमिकोकडे येणाऱ्या पोस्टमनलासुद्धा ती किती अधीर, उतावीळ झाली आहे ते कळत होतं. ''आज कॅनडाहून काही आहे का?'' बाहेरच्या फाटकाकडून घराकडे येणारा पोस्टमन दिसला की ती विचारे. रोज ''नाही'' हे उत्तर ऐकल्यावर तिच्या चेहऱ्यावरची निराशा पाहायला त्यालाही नको वाटायचं.

महिन्याच्या शेवटच्या दिवशी सेंटरला भेट देण्यासाठी आलेल्या पाहुण्यांचं स्वागत करण्याच्या गडबडीत फ्युमिको होती. काही शाळांचे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन हॅनाची सूटकेस पाहायला आणि हॉलोकॉस्टबद्दल माहिती घ्यायला आले होते. इतक्यात फ्युमिकोचं लक्ष खिडकीबाहेर गेलं. हसऱ्या चेहऱ्यानं घाईघाईत येणारा पोस्टमन तिला दिसला. फ्युमिको त्याला भेटायला धावतच गेली. ''हे घ्या,'' पोस्टमन हसून म्हणाला आणि त्यानं एक जाड पाकीट तिच्या हातात दिलं.

''थँक्यू! आज माझा दिवस तुमच्यामुळे चांगला जाणार. थँक्यू!'' फ्युमिको म्हणाली.

पाकीट घेऊन फ्युमिको ऑफिसमध्ये गेली आणि तिनं ते उघडलं. पत्राच्या घड्या



उलगडताच आतून फोटो बाहेर पडले. चमकदार सोनेरी केसांच्या आणि हसऱ्या चेहऱ्याच्या हॅनाचे ते चार फोटो होते. फ्युमिकोला राहवलं नाही. तिनं आनंदानं आरोळीच ठोकली. आलेल्या पाहुण्यांमधले काही जण धावत आले. ''काय झालं?''



हॅना

''काही नाही, काहीही झालेलं नाही,'' फ्युमिको अडखळत म्हणाली. ''मला खूप आनंद झालाय! हे बघा, हॅनाचे फोटो. जिची गोष्ट शोधण्यासाठी आम्ही इतकी धडपड केली, तीच ही गोड छोकरी.''

फोटोंसोबत जॉर्ज ब्रॅडींचं एक लांबलचक पत्रही होतं. त्यात नोव्हे मेस्टोमधल्या सुखी दिवसांबद्दल, त्यांच्या कुटुंबाबद्दल, हॅनाच्या आवडीच्या स्की आणि स्केटिंग या खेळांबद्दल लिहिलं होतं. युद्धानं सगळ्याचा नाश करण्यापूर्वी हॅनाचं आयुष्य अतिशय आनंदी होतं, हे समजल्यानं सर्वांनाच बरं वाटलं.

शिवाय त्या पत्रातून जॉर्जबद्दलही कळलं. त्यांचं कॅनडातलं आयुष्य, मुलं, नातवंडं वगैरेबद्दल वाचताना फ्युमिकोला अतिशय आनंद होत होता. आनंदानं तिला रडूच आलं. 'ते जिवंत आहेत' असं ती स्वतःलाच पुन्हापुन्हा सांगत राहिली. हे सगळं 'स्मॉल विंग्ज'च्या मुलांना सांगण्याची आता तिला घाई झाली.



# टोकियो

## मार्च २००१

''शांत रहा! ते लवकरच इथे पोचतील; नक्की!'' फ्युमिको हसून म्हणत होती.

पण तरीही मुलांचा दंगा थांबत नव्हता. सेंटरमध्ये त्यांची नुसती धांदल उडाली होती. आपल्या कविता पुन्हापुन्हा नीट तपासणं, कपडे ठाकठीक करणं, वेळ लवकर जावा म्हणून फुटकळ विनोद सांगून हसणं, असं चाललं होतं. माइकोकडे सगळ्यांना शांत करण्याचं काम होतं; पण तीच इकडून तिकडे उड्या मारत होती.

अखेर एकदाचं वाट पाहणं संपलं. जॉर्ज ब्रॅडी सेंटरवर आले. त्यांच्याबरोबर होती त्यांची सतरा वर्षांची मुलगी - लारा हॅना.

आता मुलं एकदम गप्प झाली. सेंटरच्या मुख्य दरवाजापाशी ती जॉर्जभोवती गोळा झाली. त्यांनी जपानी पद्धतीनं कमरेत लवून जॉर्ज ब्रॅडींना अभिवादन केलं. अकिरानं जॉर्जना रंगीबेरंगी कागदांची ओरिगामीची माळ भेट दिली. सगळ्या मुलांची त्यांच्या अगदी जवळ जाण्याची धडपड चालू होती. अनेक महिन्यांपासून फ्युमिकोकडून त्यांच्याबद्दल फक्त ऐकलं होतं. आता त्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मुलांना मिळत होती.

फ्युमिकोनं जॉर्ज ब्रॅडींचा हात धरला आणि म्हणाली, ''चला, आपण तुमच्या बहिणीची सूटकेस पाहू या.'' मग सगळे प्रदर्शनाच्या जागी गेले.

आणि तिथे मुलांच्या कोंडाळ्यात, एक हात फ्युमिकोच्या हातात आणि दुसरा हात आपल्या मुलीच्या - लाराच्या - हातात देऊन जॉर्ज ब्रॅडींनी ती सूटकेस पाहिली.

अचानक एक असह्य दुःख त्यांच्या चेहऱ्यावर दाटून आलं. ती सूटकेस त्यांच्यासमोर होती आणि तिच्यावर नाव लिहिलं होतं: हॅना ब्रॅडी; जॉर्जची सुंदर, धीट, खोडकर, उदार मनाची आणि मनमिळाऊ बहीण. अगदी लहान वयात तिला भयानक मरण आलं होतं. जॉर्ज ब्रॅडींनी मान झुकवली आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले.

पण काहीच क्षणांनी त्यांनी मान वर करून पाहिलं. त्यांना आपली मुलगी दिसली; हॅनाची गोष्ट आणि जॉर्जचा ठावठिकाणा शोधून काढण्यासाठी इतकी धडपड करणाऱ्या फ्युमिकोचा चेहरा दिसला; ज्यांच्यासाठी हॅना पुन्हा जिवंत होऊन आली होती, त्या सगळ्या जपानी मुलांचे चेहरेही दिसले.




टोकियो हॉलोकॉस्ट सेंटरला दिलेल्या भेटीत मुलांशी बोलताना जॉर्ज.
शेजारी फ्युमिको हॅनाच्या सूटकेसचे चित्र घेऊन उभी आहे.






जॉर्ज ब्रॅडींना जाणवलं की, अखेर हॅनाची एकतरी इच्छा पूर्ण झाली होती. ती शिक्षिका झाली होती. सहनशीलता, आदर आणि करुणा ही जगातली सर्वांत महत्त्वाची मूल्यं आहेत यावर त्यांचा विश्वास होता आणि हॅनाच्या कहाणीनं, तिच्या सूटकेसनं हजारो जपानी मुलांना हेच शिकवलं होतं. त्यांना वाटलं: फ्युमिकोनं आणि या मुलांनी आपल्याला ही केवढी मोठी भेट दिली आहे! हानाबद्दल केवढा आदर दाखवला आहे!

फ्युमिकोनं मुलांना वर्तुळात बसायला सांगितलं. एकेका मुलानं जेव्हा आपण केलेली हॅनाबद्दलची कविता किंवा चित्र जॉर्ज ब्रॅडींना दिलं, तेव्हा तिचा चेहरा अभिमानानं फुलून आला. सगळ्यांच्या भेटी देऊन झाल्यावर माइको उठली. तिनं मोठ्ठा श्वास घेतला आणि मोठ्ठ्या आवाजात एक कविता वाचून दाखवली.

तेरा वर्षांची हॅना ब्रॅडी; या सूटकेसची मालकीण.
पंचावन्न वर्षांपूर्वी, १८ मे १९४२ या दिवशी,
तिच्या अकराव्या वाढदिवसानंतर दोनच दिवसांनी
तिला चेकोस्लोव्हाकियामधल्या तेरेत्सिन या गावी नेण्यात आलं.
२३ ऑक्टोबर १९४४ या दिवशी,
गर्दीनं भरलेल्या एका मालगाडीतून

तिला आउसश्वित्सला पाठवण्यात आलं.
तिला लगेचच गॅस चेंबरमध्ये नेण्यात आलं.
त्या वेळी प्रत्येकाला एकच सूटकेस जवळ ठेवण्याची परवानगी असे.
हॅनानं आपल्या सूटकेसमध्ये काय काय घेतलं असेल?
आज हॅना एकोणसत्तर वर्षांची झाली असती;
पण वयाच्या तेराव्या वर्षीच तिचं आयुष्य संपवलं गेलं.
तेरेत्सिनमध्ये काढलेली काही चित्रं, एवढंच ती आपल्यासाठी ठेवून गेली.
ही चित्रं आपल्याला काय सांगतात?
तिच्या कुटुंबाच्या छान आठवणी?
भविष्याची स्वप्नं आणि आशा?
तिला का मारून टाकलं गेलं?
काही कारण नव्हतं.
एकच कारण होतं: ती ज्यू म्हणून जन्माला आली होती.
नाव - हॅना ब्रॅडी; जन्म १६मे, १९३१. अनाथ.
आम्ही - 'स्मॉल विंग्ज'ची मुलं- हॅनाचं काय झालं
ते जपानमधल्या प्रत्येक मुलाला सांगू.
आम्ही - 'स्मॉल विंग्ज'ची मुलं -
पंधरा लाख ज्यू मुलांचं काय झालं,
ते कधीही विसरणार नाही.
या जगात शांतता नांदावी म्हणून आम्ही मुलं काहीतरी करू,
म्हणजे पुन्हा कधीही 'हॉलोकॉस्ट' घडणार नाही.

'स्मॉल विंग्ज'कडून, डिसेंबर २०००, टोकियो, जपान.





स्टेजच्या डाव्या कोपऱ्यात माइको कविता वाचत असताना स्मॉल विंग्जच्या सदस्यांनी,
'एकविसाव्या शतकात शांतता प्रस्थापित करण्यासाठी हे समजून घ्या व विचारपूर्वक कृती करा,'
असा संदेश देणारा फलक हाती धरला होता.

# उपसंहार

हॅनाच्या गोष्टीमधले आश्चर्याचे धक्के अजून संपलेले नाहीत. २००४साली जॉर्ज ब्रॅडींसह फ्युमिकोनं पोलंडला भेट दिली, तेव्हा त्यांना कळलं की, इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम या ठिकाणी हॉलोकॉस्टमधल्या अनेक वस्तू होत्या. तिथे १९८४साली लागलेल्या संशयास्पद आगीमध्ये इतर अनेक वस्तूंबरोबर हॅनाची मूळची सूटकेसही जळून गेली.

नंतर आउसश्वित्समधल्या संग्रहालयानं फोटोवरून हॅनाची सूटकेस पुन्हा तशीच्या तशी तयार केली. फ्युमिको आणि 'स्मॉल विंग्ज'च्या हातात हीच सूटकेस आली. खरं तर, अशा प्रकारे एखाद्या वस्तूची प्रतिकृती- म्हणजे मूळ वस्तूवरून केलेली नक्कल- प्रदर्शनासाठी उसनी द्यायची असेल तर तशी स्पष्ट पूर्वकल्पना द्यावी, असा संग्रहालयांचा नियमच आहे. पण हॅनाच्या सूटकेसबाबत मात्र काहीतरी चूक झाली. आपल्याला मिळालेली सूटकेस ही हॅनाची मूळची सूटकेस नाही, याची कल्पना पोलंडला जाईपर्यंत जॉर्ज आणि फ्युमिकोला नव्हती.

पण मग विचार केल्यावर सर्वांनाच वाटलं की, आउसश्वित्सच्या संचालकांनी इतके कष्ट करून ही हुबेहूब प्रतिकृती तयार केली, हे चांगलंच झालं. ती नसती, तर फ्युमिकोनं हॅनाचा शोध घेतला नसता. तिला जॉर्ज ब्रॅडींचाही पत्ता लागला नसता आणि आपल्याला हॅनाच्या सूटकेसची गोष्टही समजली नसती.

आज जगातली हजारो मुलं वीसहून अधिक भाषांमध्ये 'हॅनाची सूटकेस' वाचत असतात. हॅनाची गोष्ट सांगत, इतिहासातून धडे घेत आणि सहिष्णुतेचा संदेश जगाला देत फ्युमिको, जॉर्ज आणि ती सूटकेस यांनी आपला हा प्रवास चालूच ठेवला आहे.